SHIV VANI
# शिव वाणी
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521
L/130/RNP/Renewal/2025-2026

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी
संपादक : वैभव विवेक स्वामी

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक ०८ | सोमवार दि.२३ फेब्रुवारी २०२६ | RNI- MAHMAR2003/14666 | पाने : ४ | किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -08 | MONDAY DT.23 FEBRUARY 2026 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 03 RUPEES

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# लव्ह जिहादविरोधी कठोर कायद्यासाठी महायुती सरकारच्या हालचाली



मुंबई : राज्यात फोफावलेल्या 'लव्ह जिहाद'च्या विळख्यातून हिंदू भगिनींची सुटका करण्यासाठी आणि धर्मांतराच्या कुटिल डावाला लगाम घालण्यासाठी महायुती सरकारने कंबर कसली आहे. आजपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच 'लव्ह जिहादविरोधी कायदा' संमत करण्याच्या हालचालींना वेग आला असून, हिंदुत्ववादी संघटनांच्या प्रदीर्घ मागणीची दखल घेत सरकार आता निर्णायक पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे.

राज्यातील विविध हिंदू संघटनांनी 'लव्ह जिहाद' आणि छुप्या धर्मांतरणाच्या वाढत्या घटनांविरोधात आवाज उठवत कठोर कायद्याची मागणी केली होती. या मागणीचे गांभीर्य ओळखून सरकारी पातळीवर कायदेतज्ज्ञांची एक विशेष बैठक लवकरच आयोजित केली जाणार आहे. प्रलोभन, बळजबरी किंवा कपटी मार्गाने होणारे धर्मांतर रोखण्यासाठी त्यात महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या जातील. गुजरात राज्याने अलीकडे याविषयी कायदा केला आहे. त्याचा अभ्यास केला जाणार आहे. त्याशिवाय भाजपचे ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार आणि अतुल भातखळकर यांनी मागील काही अधिवेशनामध्ये याविषयी अशासकीय विधेयके मांडली होती. त्यांचाही अभ्यास करून याविषयीचे विधेयक दोन्ही सभागृहात सादर

## लव्ह जिहादविरोधी कठोर कायद्यासाठी महायुती सरकारच्या हालचाली

### अर्थसंकल्पीय अधिवेशनातच विधेयक येण्याची शक्यता; गुजरातच्या कायद्याचा अभ्यास करणार

केले जाईल, असे समजते.

कायद्यातील प्रस्तावित कठोर तरतुदी

– मिळालेल्या माहितीनुसार, या कायद्यात गुन्हेगारांवर जरब बसवण्यासाठी अत्यंत कठोर शिक्षेची तरतूद असेल. म्हणजे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, प्रलोभन दाखवून किंवा कपटी मार्गाने धर्मांतर केल्यास ३ वर्षांपर्यंत कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची तरतूद असेल.– अज्ञान महिला, अनुसूचित जाती किंवा जमातीमधील महिलेचे धर्मांतर घडवून आणल्यास ५ वर्षांचा तुरुंगवास आणि १ लाखांच्या दंडाची शिक्षा सुनावली जाईल.

– कोणत्याही धर्मांतर विधीपूर्वी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना विहित नमुन्यात माहिती देणे बंधनकारक राहील. यात कसूर केल्यास १ वर्षाचा कारावास भोगावा लागेल.

– या कायद्यांतर्गत होणारे गुन्हे 'दखलपात्र' असतील आणि पोलीस निरीक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारीच याचा तपास करेल.

### सामाजिक संतुलनासाठी कायद्याची गरज

धर्मांतरण म्हणजे एखाद्याच्या श्रद्धेला धक्का पोहोचवणे होय. दारिद्र्याचा किंवा अज्ञानाचा गैरफायदा घेऊन जेव्हा बळजबरीने धर्मांतर घडवले जाते, तेव्हा समाजाचे संतुलन बिघडते. यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येते. धर्मांतराच्या या देशविघातक प्रकारांना आळा घालण्यासाठी हा कायदा अत्यावश्यक आहे.

---

# गेवराई येथे शिवसेना जिल्हाप्रमुख यांच्या नेतृत्वाखाली निषेध आंदोलन संपन्न



### देशाच्या सन्मानाशी तडजोड मान्य नाही,राहुल गांधींनी माफी मागावी – अँड.चंद्रकांत नवले

बीड /प्रतिनिधी

भारत-अमेरिका व्यापार करार संदर्भात बोलताना राहुल गांधी यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याबाबत वापरलेला 'कॉम्प्रमाईज्ड' हा शब्द केवळ व्यक्तीवर नव्हे, तर देशाच्या सर्वोच्च पदावर आघात करणारा आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नेतृत्व करत असलेल्या पंतप्रधानां विषयी अशा प्रकारची अवमानास्पद भाषा वापरणे हे लोकशाही परंपरेला आणि राष्ट्राच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे आहे. शिवसेना याचा जाहीर निषेध करते आणि राहुल गांधी यांनी देशाची तात्काळ माफी

(उर्वरीत पान २ वर)

# जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत भाजपा जिल्हा कार्यालयात मन की बात व टिफीन बैठक संपन्न

बीड /प्रतिनिधी

प्रदेश सूचनेनुसार, लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या उपस्थितीत आज देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची मन की बात व टिफीन बैठक कार्यक्रम भाजपा जिल्हा कार्यालयात संपन्न झाला.

सरळ प, नमो प, पंडित दीनदयाळ उपाध्याय कार्यशाळा, वक्ता सूची आदी विषयी सर्वांना

(उर्वरीत पान २ वर)



---

# आ.सुरेश धस यांचे प्रयत्न फलदायी

### दत्ताभाऊ काकडे यांच्या नेतृत्वाला यश – परिवंत गायकवाड

आष्टी / राजेंद्र लाड

महाराष्ट्रातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने जाहीर केल्यानंतर ग्रामीण भागात समाधानाची भावना व्यक्त होत आहे. या निर्णयामागे सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांचे सातत्यपूर्ण नेतृत्व आणि पाठपुरावा तसेच मराठवाडा भूषण आ. सुरेश धस यांचे शासनस्तरावरील प्रयत्न निर्णायक ठरले आहेत. या पार्श्वभूमीवर आष्टी येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते तथा जयदीप कन्स्ट्रक्शन प्रा. लि. आष्टी या संस्थेचे सर्वेसर्वा परिवंत गायकवाड यांनी विशेष दखल घेत दोन्ही नेत्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

ग्रामपातळीवरील प्रशासकीय सातत्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर दत्ताभाऊ काकडे यांनी हा विषय केवळ संघटनात्मक मागणी म्हणून न मांडता ग्रामीण विकासाच्या दृष्टीने तो शासनासमोर ठामपणे मांडला. राज्यभरातील सरपंचांशी संवाद साधत त्यांनी परिस्थितीचे वास्तव शासनापर्यंत पोहोचवले. ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर निर्माण होणारी प्रशासकीय पोकळी, रखडलेली विकासकामे, निधीवाटपातील अडचणी, तसेच गावकऱ्यांच्या अपेक्षांवर होणारा







परिणाम या सर्व बाबींचे मुद्देसूद निवेदन त्यांनी संबंधित विभागांकडे सादर केले. स्थानिक नेतृत्वावर विश्वास ठेवून विद्यमान सरपंचांनाच प्रशासकपदाची जबाबदारी देणे हे अधिक परिणामकारक ठरेल, अशी भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने सरपंच परिषदेसाठी हे मोठे यश मानले जात आहे.

या निर्णयामध्ये आ. सुरेश धस यांनीही महत्त्वाची भूमिका बजावल्याचे नमूद करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असलेले लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहिले. ग्रामविकासातील सातत्य, निधींचा प्रभावी वापर आणि प्रशासनातील स्थैर्य यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, यासाठी त्यांनी संबंधित स्तरावर पाठपुरावा केला. ग्रामीण भागातील जनतेच्या अपेक्षा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी विषय शासनाच्या निदर्शनास आणून दिला. परिणामी राज्य सरकारने विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे गावपातळीवरील कामकाज सुरळीत सुरू राहणार आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना परिवंत गायकवाड यांनी दत्ताभाऊ काकडे आणि आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाची विशेष दखल घेतली आहे. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या अभिनंदनपर संदेशात म्हटले आहे की, ग्रामपंचायत ही लोकशाहीची पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे. गावाचा विकास थांबू नये, यासाठी प्रशासनात सातत्य आवश्यक आहे. हा निर्णय ग्रामीण महाराष्ट्रासाठी अत्यंत हितावह आहे.

परिवंत गायकवाड यांनी पुढे नमूद केले की, दत्ताभाऊ काकडे यांनी संघटनात्मक पातळीवर केलेला लढा आणि आ. सुरेश धस यांनी शासनस्तरावर केलेला पाठपुरावा हे या निर्णयामागील दोन महत्त्वाचे स्तंभ आहेत. स्थानिक नेतृत्वावर विश्वास ठेवणारा हा निर्णय ग्रामविकासाला गती देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उद्योजक म्हणून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांशी जवळून संबंध आल्याने प्रशासनातील सातत्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

विकासकामे अर्धवट राहू नयेत, मंजूर निधी परत जाऊ नये आणि ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी हा निर्णय योग्य वेळी घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठवाडा भूषण आ. सुरेश (आण्णा) धस मित्र मंडळ, कऱ्हेवडगाव, ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीनेही या निर्णयाबद्दल

(उर्वरीत पान २ वर)



संपादकीय....

# माणसातला देव, देवातला माणूस

अमरावती जिल्ह्यातील शेणगाव हे बाबांचे जन्मगाव. २३ फेब्रुवारी १८७६ या दिवशी ईश्वराने साऱ्यांचे भले व्हावे या हेतूने एक देवदूत या पृथ्वीतलावर धाडला तो म्हणजे गाडगे बाबांच्या रूपानेच. डेबूजी हे मूळ नाव. वडील बालपणीच व्यसनाने गेले. ते आई समवेत मामाच्या गावी दापूर येथे काबडकष्ट करून मोठे झाले. मामाचे मन जिंकले. सावकाराकडील मामाची शेती मोठ्या शक्ती-युक्तीने झुंजून मिळविली आणि ती मामाच्या स्वाधीन केली. सहकार्य केले. बालपणापासूनच बहादूर डेबूजी १८९२ साली विवाहबद्ध झाले. त्यांच्या पत्नीचे नाव कुंताबाई. कुंताबाई विवाहबद्ध होऊन दोन कन्यांना त्यांनी जन्म दिला. एके दिवशी एक साधू गावात आला. डेबूंना त्यांचा लळा लागला. अशातच अचानक डेबूजींच्या गैरहजेरीत तो साधू परागंधा झाला. आई, दोन मुली, पत्नी तीन महिन्यांची गरोदर सोडून डेबूजी साधूचा शोध घेण्यासाठी घराबाहेर गेले. अंगावर चिंध्या पांघरून, हातात खराटा, डोक्यावर खापराचा तुकडा, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात बांगडी, दोन पायांत दोन वेगवेगळ्या चपला. गावोगाव हिंडत, दिवसभर गावच्या गावं स्वच्छ करायची ती खराट्याने. रात्री मात्र गावच्या लोकांची मन स्वच्छ करायची ती कीर्तनाने. संसार सोडून कधी बुद्ध होऊन शांतीचा मूलमंत्र. तर कधी अभंग, कीर्तनातून ज्ञानोबांचे, तुकोबांचे साधुत्व, देवत्व आणि ममत्व, संतत्व जोडणाऱ्या हा अवलिया म्हणजे गाडगे बाबा.

समता-बंधुता, एकता, संस्कृती व श्रमसंस्कृती बाबांठाई नांदत होती. मानव कल्याण व जनजागृती सातत्याने घडत होती. सामाजिक प्रबोधन अहोरात्र करत होते. तहानलेल्यास पाणी व भुकेल्यास अन्न. बेघरांना घर, बेकारांना काम, रुग्णांना इलाज, लुळ्यापांगळ्यांना बळ, मुक्या प्राण्यांना दया द्यावी ही बाबांची शिकवण होती. संगतीला गाडगे अन् मुखात संतांची वचने! निर्मूही, निरपेक्ष, परोपकारी सेवाभावी बाबा! माणसात देव शोधणारा संत म्हणून गाडगे बाबांची ओळख आहे.

तीर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी असे म्हणत.

अन्याय, अस्पृश्यता, अत्याचार, अंधश्रद्धा याचे तळमळीने उच्चाटन करीत. मूर्तिपूजा, सावकारी कर्ज, अशिक्षितपणा, अस्वच्छता, देव-देवसकी छळ, लबाडी, भांडण-तंटा यावर कीर्तन करीत. नेहमी शेतावरचे कुदळ, नांगर आहे. कुंभाराच्या भट्टीवर माती तुडव. कोणी कुष्ठरोगी दिसला की त्यास चोळून मळून आंघोळ घाल. नाव विचारले की म्हणत, मले मालूम नाही. कोणी जात विचारले की, माणूस म्हणत. फक्त माणूस जात! कामाचा रस्ता न रस्ता झाडूने साफ करत. पण पगार काय घेणार? दहा लाख! विनोदी बोलत, देवळाभोवती साफसफाई करत. ती स्वतः साफसफाई करत आणि कीर्तनही.

# आष्टीत उमेद अभियानांतर्गत १२१ स्वयसहाय्यता समूहांना ५ कोटी १० लाखांचे अर्थसहाय्य

## खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते मंजुरी पत्रांचे वितरण

आष्टी - (प्रतिनिधी)

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत आष्टी तालुक्यात महिला सक्षमीकरणाचा भव्य सोहळा पार पडला. तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती आष्टी यांच्या विद्यमाने दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात तालुक्यातील १२१ स्वयंसहाय्यता समूहांना एकूण ५ कोटी १० लाख रुपयांच्या बँक अर्थसहाय्य मंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले. हा वितरण सोहळा खासदार बजरंग सोनवणे (बप्पा) यांच्या शुभहस्ते पार पडला.

दौलावडगाव (सकाळी ९:३० वा.), धानोरा (सकाळी ११:०० वा.), कडा (दुपारी २:०० वा.) आणि आष्टी (सायं. ५:०० वा.) अशा चार ठिकाणी कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ग्रामीण भागातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले.

यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी महिलांच्या कार्याचे कौतुक करताना, आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील महिला आज सक्षमपणे पुढे येत आहेत. उमेद अभियानाचे कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, महिलांनी मिळालेल्या अर्थसहाय्याचा योग्य उपयोग करून स्वावलंबी व्हावे, असे प्रतिपादन केले.



कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीडच्या प्रकल्प संचालक मा. श्रीमती संगीतादेवी पाटील, मा. श्रीमती वासिमा शेख (प्रांत अधिकारी), मा. तहसीलदार साहेब, गटविकास अधिकारी मा. गोकुळ बागलाणे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे जिल्हा अभियान व्यवस्थापक मा. श्री. शकील शेख, जिल्हा व्यवस्थापक (आर्थिक) मा. श्री. मुरहरी सावंत, पंचायत समिती आष्टी अंतर्गत सर्व विभाग प्रमुख तसेच तालुक्यातील सर्व बँक व्यवस्थापक यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील व जिल्हा अभियान व्यवस्थापक शकील शेख यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना स्वयं सहाय्यता समूहांच्या माध्यमातून उद्योग उभारणी, आर्थिक शिस्त, बचत गट व्यवस्थापन व उद्योजकता विकास याबाबत सविस्तर माहिती दिली. या अर्थसहाय्यामुळे महिलांना लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय, गृहउद्योग व विविध सेवा क्षेत्रात उद्योग सुरू करण्यासाठी मोठे आर्थिक बळ मिळणार आहे.

कार्यक्रमाला ग्रामसखी, प्रभागसंघ, ग्रामसंघ व स्वयंसहाय्यता समूहातील पदाधिकारी व सदस्य, उमेद आष्टी येथील सर्व कर्मचारी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावर गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, मा. जि. प. अध्यक्ष डॉ. शिवाजी राऊत, सतीश आबा शिंदे, किशोर हंबर्डे, सुनिल नाथ, आण्णासाहेब चौधरी, अमोल तरटे, महादेव डोके, अशोक पोकळे, संतोष काकडे, राहुल काकडे, दिगंबर पोकळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या उपक्रमामुळे आष्टी तालुक्यातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाला नवी दिशा मिळाली असून, ग्रामीण भागातील महिला स्वावलंबनाकडे वाटचाल करत असल्याचे चित्र या सोहळ्यातून स्पष्ट झाले. उमेद अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाचा हा टप्पा तालुक्याच्या विकासासाठी निश्चितच मैलाचा दगड ठरणार आहे. याप्रसंगी सुनिता कराड, सिमा सय्यद, अनिता पोकळे, शारदा चखाले यांनी आपले मनोगत व समस्या मांडल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन शकील शेख यांनी केले तर आभार विक्रम डोंगरे यांनी मानले. सदरील कार्यक्रमात स्व. अजित दादा पवार

# सांस्कृतिक कार्यक्रमातून कलागुणांना वाव मिळतो - नगराध्यक्षा गिताभाभी पवार

## शानदार समारंभात बक्षिस वितरण

गेवराई : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सांस्कृतिक कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. त्यामुळे, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. असे प्रतिपादन गेवराई च्या नगराध्यक्षा गिताभाभी बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.

बुधवार ता. १८ रोजी, वार बुधवार, भगवती टॉकीज परिसराच्या मैदानावर, गेवराई नगर परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक महोत्सवात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर बाळराजे पवार, नायब तहसीलदार संजय सोनवणे , जिपचे माजी सभापती युद्धाजीत पंडित, पोलिस निरीक्षक किशोर पवार,

नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, उपाध्यक्षा रेवती घुंबार्डे,

गटनेते ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, नपचे सभापती शहेदाद भाई, उपसभापती सोनाली सुतार, नगरसेवक राजेश टाक, नगरसेविका अंकिता धोंडलकर, सभापती प्रशांत राख, नगरसेवक शिनुभाऊ बेदरे, राजाभाऊ आर्दड, नगरसेवक आबासाहेब काकडे, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, उपाध्यक्ष दादासाहेब गिरी यांची उपस्थिती होती. नगराध्यक्षा गीताताई पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, नगर परिषदेच्या स्वच्छता अभियानात सहभाग घेण्याचे



आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनी ही शुभेच्छापर संदेश दिला. नप ने आयोजित केलेल्या सांस्कृतिक महोत्सवात विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून, बहारदार अभिनयातून लक्षवेधी कलाकृती सादर करून रंगमंचावर धमाल केली. बुद्धिबळ स्पर्धा निकालात

प्रथम- संस्कार सिद्धार्थ नरवडे, चिन्तेश्वर प्राथ विद्यालय, द्वितीय - शिवतेज दिनेश औटे, केंब्रिज आय स्कूल ,प्रथम - प्राची प्रशांत राऊत केंब्रिज आय स्कूल, द्वितीय - सिद्धी उमेश चौडिया, तुळजा भवानी स्कूल, प्रथम - अश्विन मच्छिंद्र दहीवाळ विमला माध्यमिक विद्यालय,द्वितीय- रणवीर तुळशिराम सोळंके ,केंब्रिज आय स्कूल, प्रथम - विद्या शिवप्रसाद पोपळघट, सेंट झेवियर्स स्कूल ,द्वितीय - काव्य अमोल कनपुरे याने बाजी मारून यश संपादन केले.चित्रकला स्पर्धेत प्रथम -अक्षरा राजेंद्र राठोड, सेंट झेवियर्स स्कूल,द्वितीय- महेश मधुकर तौर, शारदा विद्यामंदिर ,तृतीय- ओवी प्रवीण वावरे, केंब्रिज आय स्कूल, प्रथम-महिमा लक्ष्मण सोनावणे, सेंट झेवियर्स स्कूल, द्वितीय - आराध्य अप्पासाहेब चव्हाण, केंब्रिज आय स्कूल,तृतीय-श्रुतिका लहू म्हेत्रे, विमला माध्यमिक विद्यालयाला मिळाले.रांगोळी स्पर्धेत प्रथम-सानिका आखरे, केंब्रिज आय स्कूल, द्वितीय- वैष्णवी राम सोळंके,चिंतेश्वर प्रा विद्यालय ,तृतीय- आरोही प्रशांत जाधव,विमला विद्यामंदि,प्रथम- गौरी दादासाहेब खडके,विमला माध्यमिक विद्यालय ,द्वितीय-प्राजक्ता अशोक कादे ,कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ,तृतीय-आदिती महादेव पांचाळ,सेंट झेवियर्स स्कूल गेवराई यांचा नंबर आला.वक्तृत्व स्पर्धेत प्राथमिक गटात प्रथम-

मोमीन अहमन आत्तार, मिल्लत इंग्लिश स्कूल,द्वितीय -ईश्वरी रामेश्वर भुते,तुळजा भवानी इंग्लिश स्कूल, तृतीय-तृप्ती संभाजी नरवाडे,केंब्रिज आय स्कूल , माध्यमिक गटातून

प्रथम- प्रियांशु रविकांत लाड,सेंट झेवियर्स स्कूल,द्वितीय- मनस्वी दिनकर शिंदे,सेंट झेवियर्स स्कूल, तृतीय- नेहा रमेश म्हस्के, केंब्रिज आय स्कूल गेवराई हिने बाजी मारून यश संपादन केले.शोभायात्रा व पथसंचालनात जि. प कन्या प्रशाला गेवराई शाळेला प्रथम क्रमांक मिळाला. न्यू इरा इंग्लिश स्कूल गेवराई या शाळेला द्वितीय तर केंब्रिज आय स्कूलने तृतीय क्रमांक पटकावला आहे.चॅम्पियन्स संघ म्हणून सेंट झेवियर्स स्कूल गेवराई यांना , उपविजेता संघाचा मान द केम्ब्रिज व्हली इंटरनशनल स्कूल गेवराईला देण्यात आला. कार्यक्रमाचे परिक्षण प्रकाश भुते , प्रशांत रूईकर, दिनकर शिंदे, सुशिल टकले, अंजली खोबरे, अमित गाडे यांनी केले. सूत्रसंचालन श्याम वादे, प्राची दरडे यांनी केले. कार्यक्रमास





# शिवप्रेमींसाठी सचिन साखरे व गणेश काळदाते यांचा आदर्श सेवा उपक्रम

केज/प्रतिनिधी

शिवजयंती सोहळ्या निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही पत्रकार तथा चहा हॉटेल व्यावसायिक सचिन धनराज साखरे यांनी शिवप्रेमींसाठी चहा व शुद्ध पाण्याची उत्तम व्यवस्था करून समाजा समोर आदर्श निर्माण केला.समाज जाणिवेतून गेली अनेक वर्षे ते हा उपक्रम सातत्याने राबवत असून त्यांच्या या सेवाभावी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.या उपक्रमाला दरवर्षीप्रमाणे यंदाही मराठवाडा दूध डेअरीचे मालक गणेश काळदाते यांनी मोलाचे सहकार्य केले.दोघांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या अनेक वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम अविरतपणे सुरू आहे. शिवजयंतीसारख्या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळ्यात शिवप्रेमींसाठी विनामूल्य चहा व पाण्याचीव्यवस्था करणे ही केवळ सेवा नसून छत्रपतींच्या विचारांना अभिवादन करण्याची एक प्रेरणादायी कृती असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

यावर्षीची शिवजयंती डीजे मुक्त जयंती म्हणून साजरी करण्यात आल्या मुळे वातावरण अधिक उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध होते.तरुणाई सोबतच महिला,ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांची उपस्थिती लक्षणीय प्रमाणात होती. वाढलेल्या सहभागामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वृद्धिंगत झाली. सर्व स्तरातून अशीच शिस्तबद्ध,सांस्कृतिक आणि प्रेरणादायी शिवजयंती भविष्यातही साजरी व्हावी,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सचिन साखरे आणि गणेश काळदाते यांनी सातत्याने राबविलेल्या या उपक्रमाबद्दल पंचक्रोशीतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.मित्रपरिवार व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.समाजसेवेची ही परंपरा येणाऱ्या अनेक वर्षांपर्यंत त्यांच्या हातून अखंडपणे सुरू राहो, हीच सर्वांची मनापासून अपेक्षा व्यक्त होत आहे.

# खंडणीसाठी घरात घुसून मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरातील छल्लानी कॉलनी येथे खंडणीच्या कारणावरून घरात घुसून मारहाण करून रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावल्याची घटना २० फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी मंठा पोलीस ठाणे येथे चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी आशिषकुमार अरविंद (वय ४२, रा. छल्लानी कॉलनी, मंठा, जि. जालना) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, एकनाथ शिवशिंग चंदेल (रा. तळणी, ता. मंठा), उस्मान आयुब खाँ पठाण (रा. किर्ला, ता. मंठा) व दोन अनोळखी इसम यांनी संगनमत करून त्यांच्या घरात प्रवेश केला.

आरोपींनी लोखंडी रॉडने फिर्यादीच्या उजव्या पायावर वार करून जखमी केले. तसेच चाकूचा धाक दाखवत शिवीगाळ केली व त्यांना खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, फिर्यादीच्या खिशातून जबरदस्तीने ११ हजार रुपये काढून घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.या प्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना. मंगेश चौरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

पान १ वरुन...

**जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख ..**

मार्गदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी नवनाथ आण्णा शिराळे, गणेशजी लांडे, इर्शाद भाई, शांतीनाथ डोरले, डॉ. अभय वणवे, विक्रांत हजारी, ड. भाग्यश्रीताई ढाकणे, मनोज काका पाटील, ज्योतिबा नन्नवरे, डॉ. रवींद्र घुंबरे, सुनीलजी मिसाळ, ड. नागेश तांबारे, प्रमोद पुसरेकर, अमोल वडतिले, राजू शहाणे, संभाजी सुर्वे, महादेव नागरगोजे, नरेश पवार, राजेश चरखा, सुशील जाधव, अशोक घोडके, भालचंद्र गवळी, राजेश गवळी, केशव बडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

**गेवराई येथे शिवसेना...**

मागावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा शिवसेना बीड जिल्हा प्रमुख अँड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी दिला आहे.

या निषेध आंदोलनात जिल्हा बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अँड. चंद्रकांत (आप्पा) नवले, शिवसेना बीड जिल्हा संघटक विक्रमराजे भोसले, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहरप्रमुख मुकेश महाजन, गणेश पवार, प्रकाश नरनाळे, प्रदोष जाधव, राजु क्षिरसागर, बाळराजे डरफे, महादेव माळी यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना जिल्हा प्रमुख अँड चंद्रकांत नवले म्हणाले की, नवी दिल्ली येथे पार पडत असलेल्या ग्लोबल साऊथ ए.आय. समिट दरम्यान देशाची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिमा उंचावण्याची ऐतिहासिक संधी असताना, आंदोलनाच्या माध्यमातून भारताची बदनामी करण्याचा प्रयत्न अत्यंत निंदनीय आहे. अशा जागतिक मंचावर देशांतर्गत राजकारणाचा खेळ मांडणे म्हणजे भारताच्या सन्मानावर घाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (-ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश) सारख्या भविष्योन्मुख विषयावर भारत नेतृत्व सिद्ध करत असताना काही जणांना मात्र देशहितापेक्षा पक्षहित महत्त्वाचे वाटत आहे, ही दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे शिवसेना या बाबींचा जाहीर निषेध करत आहे. जर राहुल गांधी यांनी माफी मागितली नाही तर यापेक्षा अधिक तीव्र पद्धतीने रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी दिला.

**आ.सुरेश धस यांचे ...**

अभिनंदन व्यक्त करण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे पाणीपुरवठा योजना, अंतर्गत रस्ते, स्वच्छता उपक्रम, शाळा व अंगणवाडी दुरुस्ती, जलसंधारण प्रकल्प आदी कामांना सातत्य लाभणार आहे. स्थानिक परिस्थितीची जाण असलेल्या विद्यमान सरपंचांमुळे निर्णयप्रक्रिया जलद आणि परिणामकारक होणार आहे. एकंदरीत, दत्ताभाऊ काकडे यांच्या नेतृत्वाखालील संघटनात्मक प्रयत्न, आ. सुरेश धस यांचा शासनस्तरीय पाठपुरावा आणि परिवंत गायकवाड यांसारख्या सामाजिक भान असलेल्या उद्योजकांचा सकारात्मक पाठिंबा यामुळे हा निर्णय ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवरील विश्वास दृढ करण्यासाठी हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची रेल्वे स्थानकाला औद्योगिक भेट

## रेल्वे मार्गरचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण, ट्रॅक, पूल, स्थानकाचा अभ्यास, ४० विद्यार्थ्यांचा सहभाग

बीड प्रतिनिधी

अभियांत्रिकी शिक्षण केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कार्यपद्धतीशी जोडले गेले पाहिजे, या उद्देशातून आदित्य पॉलिटेक्निक, बीड येथील प्रथम व द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांची भारतीय रेल्वे, बीड येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या या भेटीत विद्यार्थ्यांनी रेल्वे मार्गरचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण, रेल्वे अभियांत्रिकीची प्रत्यक्ष माहिती आत्मसात केली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या अधिपत्याखाली ही भेट पार पडली. रेल्वे स्टेशन, बीड येथे विद्यार्थ्यांनी ट्रॅक लेआउट, पुलांची रचना, देखभाल पद्धती



आणि सुरक्षिततेसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा प्रत्यक्ष अभ्यास केला.

या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व व्यवस्थापन समजले. तांत्रिक दृष्टिकोन, निर्णयक्षमता, व्यावसायिक शिस्त आणि संघभावना यांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही वाढला.

या भेटीत स्थापत्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. वरपे, प्रा. अजय दुधाळ, प्रा. गोंठे यांच्यासह ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. भेटीचे नियोजन प्रा. प्रशांत दुधाळ व प्रा. अजय दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ही भेट ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

प्रत्यक्ष अनुभवातून तांत्रिक दृष्टिकोन विकसित

औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना रेल्वे ट्रॅकची रचना, पूल बांधकामातील तांत्रिक बाबी, सिग्नल प्रणाली व देखभाल प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळाली. त्यामुळे वर्गात शिकविल्या जाणाऱ्या विषयांचा अधिक सखोल व स्पष्ट अभ्यास करण्यास मदत झाली.भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधी, जबाबदाऱ्या व कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी जागरूकता निर्माण झाली असून त्यांचा आत्मविश्वास वाढला -प्राचार्य डॉ. राहुल खडके

# आर्ची आली आणि रुई गावाचा विकास पाहून भारावून गेली

## डोंगराच्या कुशीतील रुई गावाचा सर्वांनी आदर्श घ्यावा: रिंकू राजगुरु



वडवणी प्रतिनिधी–

वडवणी तालुक्यातील बालाघाटाच्या डोंगराच्या कुशीत वसलेल्या रुई (पिंपळा ) ग्राम पंचायतीने संपूर्ण राज्यात सर्वांगिण विकासाचा आदर्श निर्माण केला असून इतर गावांनीही या गावाचा आदर्श नक्कीच घ्यावा, असे प्रतिपादन सैराट फेम सिने अभिनेत्री रिंकू राजगुरु उर्फ आर्ची यांनी केले. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. शुक्रवार दि. २० रोजी रुई (पिंपळा) येथे अभिनेत्री रिंकू राजगुरु यांनी भेट देवून गावातील मुख्यमंत्र पंचायतरा विविध विकास कामांची पाहणी केली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, माँसाहेब जिजाऊ, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील उत्कृष्ट काम करणाऱ्या पाच आदर्श महिला बचतगटातील पाच महिलांचा छान अशी पैठणी साडी देवून रिंकू राजगुरु यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्लास्टिकमुक्त उपक्रमाची सुरुवात ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने पाऊल टाकत कापडी पिशवीचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी दाखवलेले मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक मान्यवर व अभिनेत्री रिंकू राजगुरु यांनी पाहिले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच शाळेतील संपूर्ण अनियन २.० डिजीटल विभागाचे उद्घाटन देखील केले. तसेच गावातील अंगणवाडीला देखील भेट दिली. व गावातील विविध विकास कामांची सुक्ष्मपणे पाहणी करत या गावचे कर्तुत्ववान युवा सरपंच मयुर भैय्या आंधळे यांचे तोंडभरुन कौतुक केले तसेच परळी येथील महापशुधन एक्स्पोत गावातील १२० शेतकऱ्यांना पर्यटन सहलीसाठी घेवून गेल्यानेही कौतुक करण्यात आले. याठिकाणी अभिनेत्री रिंकू राजगुरु यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. पुढे बोलतांना अभिनेत्री रिंकू राजगुरु म्हणाल्या की, नरेगाच्या माध्यमातून रुई ग्राम पंचायतीने उल्लेखनीय काम केले असून ३ हजार १०० फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. गावाला एक मॉडेल व्हिलेज बनवण्यासाठी प्रयत्न सुरु असून लवकरच जिल्ह्यात टॉपमध्ये स्थान मिळावे, अशा

अवघ्या ३६ तासांत संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन...

सरपंच मयुर भैय्या आंधळे यांनी केवळ ३६ तासाच्या अल्प कालावधीत आपल्या सहकाऱ्यांना व ग्रामस्थांना एकत्रित केले, जबाबदाऱ्यांचे वाटप, वेळेचे व्यवस्थापन आणि कार्यक्रमाच्या तयारी दरम्यान सजावट, पाहुण्यांचे स्वागत, बैठक व्यवस्था, इतर आवश्यक बाबींची काटेकोर अंम लबजावणी करुन त्यांनी संपूर्ण आयोजन सुरळीत पार पाडले. ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाला भव्य स्वरुप प्राप्त करुन दिले. यावेळी सिने अभिनेत्री रिंकू राजगुरु यांनी मयुर आंधळे यांच्या कार्याचे कौतुक केले. अल्पावधीत इतके उत्कृष्ट नियोजन करणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे मत व्यक्त करत त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबध्दल मान्यवरांच्या शुभहस्ते सरपंच मयुर आंधळे यांचा सत्कार करुन गौरव करण्यात आला.

शुभेच्छाही त्यांनी दिल्या. गाव सुंदर करण्यासाठी सर्वांगिण प्रयत्न करा, गाव सुंदर कसे करता येईल आणि पारितोषिक आपल्या गावाला कसे मिळेल, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या रुई (पिंपळा) गावात सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. या गावाचा आदर्श इतर गावांनी घ्यावा असे म्हणत त्यांनी सरपंच मयुर आंधळे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सरपंच मयुर

आंधळे, छायाताई शंकरराव आंधळे, सहाय्यक गटविकास अधिकारी पोहरेकर, विस्तार अधिकारी अशोक निरडे, बोरफडीचे सरपंच कैलास घुगे, पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड, पूजा खाडे, सविता लोंढे आदी म न्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच मयुर भैय्या आंधळे व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल राठोड व विष्णू आंधळे सर यांनी केले. यावेळी महिला, तरुण, तरुणी व ग्रामपंचायत सदस्य आणि पंचायत समितीचे कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण सरकारी रुग्णालय अंबाजोगाई येथे उपचार सुरू

## वयोवृद्ध शेतकरी पुरुषोत्तम अंडील यांना जीवघेणी मारहाण; प्रकृती चिंताजनक

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील ७५ वर्षीय वयोवृद्ध शेतकरी पुरुषोत्तम भाऊसाहेब अंडील यांच्यावर दगड, लोखंडी रॉड व काठीने जीवघेणी मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.१५ वाजता त्यांच्या शेतात घडली.

या प्रकरणी दामोदर रामराव अंडील, अण्णाभाऊ दामोदर अंडील, सुनील दामोदर अंडील यांच्यासह एकूण नऊ जणांनी मिळून पुरुषोत्तम अंडील, त्यांच्या पत्नी व मुलावर जीव घेण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात पुरुषोत्तम अंडील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण सरकारी रुग्णालयात मागील नऊ दिवसांपासून उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक



असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे.

दरम्यान, घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून त्यामध्ये आरोपींकडून धमक्या दिल्या जात असल्याचे स्पष्ट दिसत असल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे. मात्र, इतक्या गंभीर प्रकारानंतरही किल्ले धारूर पोलीस स्टेशनकडून अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नसल्याने कुटुंबीयांमध्ये संताप आणि भीतीचे वातावरण आहे.यापूर्वीही बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ रोजी अंडील यांच्या मुलाला मारहाण करण्यात आली होती. त्या वेळी एनसी दाखल करण्यात आली होती. तरीदेखील पुन्हा एकदा हल्ला झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.धक्कादायक बाब म्हणजे ७५ वर्षांहून अधिक वय असलेल्या आणि व्यवस्थित चालता न येणाऱ्या पुरुषोत्तम अंडील, त्यांच्या पत्नी व मुलावर उलट खोटा गुन्हा दाखल करून त्यांना नोटीस देण्यात आल्याचा आरोप त्यांच्या मुलाने केला आहे. यामुळे कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी न्यायाची मागणी केली आहे.या प्रकरणी संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

# ताकडगाव रोडवर असलेल्या एन के कॉलनीच्या अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था

## नागरिकांना रोडवरुन प्रवास करताना करावी लागते कसरत

गेवराई ( प्रतिनिधी )

ताकडगाव रोडवर असलेल्या एन.के कॉलनी अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली असून येथील रहिवाशांना या रोडवर गाडी चालवताना चांगलीच कसरत करावी लागत असून पायी चालणाऱ्या व्यक्तींना चालत आपला जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी येथील रहिवाशी नागरिकांकडून होत आहे.

गेवराई शहरातून जाणाऱ्या ताकडगाव रोड लगत एन के कॉलनी असून या कॉलनीत जवळपास ५० कुटुंब वास्तव्यास करत असून जवळपास २०० नागरीक या ठिकाणी राहाता. या रस्त्यावर पॅरामेडीकल कॉलेज असल्यामुळे या अंतर्गत रस्त्यावरुन नेहमीच वर्दळ सुरू



असते. एन.के कॉलनीत अंतर्गत रस्त्यांच्या दोन्ही बाजूने नागरीकांचे वास्तव आहे. त्यामुळे हा रोड वाहतूकीने नेहमी वापरला जातो. या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून या ठिकाणाहून वाहतूक करणे ही येथील नागरीकांना अवघड झाले आहे. या रस्त्याचे काम करुन देवू असे निवडणूकी पुर्वी अनेक पुढाऱ्यांनी आश्वासन दिले. परंतु निवडणूक संपल्यानंतर दिलेले आश्वासन हे हवेतच जिरले का? असा संतप्त प्रतिक्रिया येथील नागरिकांकडून उमटत आहेत. एन के कॉलनी ही शहरा जवळील कॉलनी असल्यामुळे येथील रहिवाशांना सर्व सुख सोई मिळतील या अपेक्षेने येथे अनेक कुटुंबे वास्तव्य करीत आहेत. परंतु या रोडची दैयनिय अवस्था पाहाता येथील नागरिकांच्या अपेक्षा फोल ठरत आहेत. एन.के कॉलनी अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली असून येथील रहिवाशांना या रोडवर गाडी चालवताना चांगलीच कसरत करावी लागत असून पायी चालणाऱ्या व्यक्तींना एखाद्या दगड गाडीच्या टायर खाली येवून लागेल या भिती पोटी पायी चालणाऱ्याना आपला जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. तर या रोडच्या दुरावस्थेमूळे या ठिकाणी नेहमीच छोट्या मोठ्या घटना घडत आहेत. शिवाय पावसाळ्याच्या दिवसात या रोडवरुन चालने ही मुश्किल होते. त्यामुळे या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेता लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देवून या रस्त्याची दयना व येथील रहिवाशी नागरीकांचे प्रश्न मार्गी लावावेअशी मागणी येथील रहिवाशी नागरिकांकडून होत आहे.

# तुकोबांच्या भक्ति रंगात पावनधाम न्हाऊन निघणार अखंड हरिनाम सप्ताह,श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथा पारायण सोहळ्याची भक्तिमय पर्वणी

केज/प्रतिनिधी

जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त औरंगपूर येथे प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम येथे अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा आठ दिवसीय भक्तिमय सोहळा दि.२६ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी प्रारंभ होऊन दि.०५ मार्च २०२६ गुरुवार रोजी सांगता होणार आहे.या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, नामस्मरण आणि अध्यात्मिक वातावरणाची निर्मिती होणार आहे.सप्ताहाच्या दरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते १२ गाथा पारायण,दुपारी २ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ कीर्तन,संगीत भजन व हरिजागर असादैनंदिन कार्यक्रम राहणार आहे.

या सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार आहे.दि.२६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.एकनाथ महाराज हांडे पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.डॉ.रामकृष्ण महाराज लहवितकर नाशिक,दि.२८फेब्रुवारी रोजी ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा,दि.०१ मार्च रोजी ह.भ.प.श्रीगुरु पुंडलिक महाराज देहूकर यांचे कीर्तन होणारअसून प्रवचन ह.भ.प.देवव्रत राणा महाराज वासकर यांचे राहील.दि.०२ मार्च रोजी ह.भ.प.उमेश महाराज दशरथे आळंदी देवाची यांचे कीर्तन व ह.भ.प.योगी निरंजन नाथजी महाराज विश्वस्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी यांचे प्रवचन होईल.दि. ०३ मार्च रोजी ह.भ.प. विश्वनाथ



महाराज वारींगे मुंबई तर दि.०४ मार्च रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापूरकर यांचे कीर्तन होईल.व दि. ५ मार्च रोजी महंत ह.भ.प.श्री महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता होईल.त्या नंतर महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.श्री. नामदेवराव इंदरराव गोरे, सुभद्रा इंडस्ट्रीज ग्रुप पुणे व समस्त गोरे परिवार यांच्या वतीने महाप्रसादा ची व्यवस्था करण्यात आली आहे.श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम विश्वस्त मंडळ,प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम, औरंगपूर यांच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला असून दि.०५ मार्च २०२६ रोजी संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त परिसरातील गावातून दिंड्या येऊन सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सर्व भाविकांनी या नामसप्ताहात सहभागी होऊन कीर्तन–भजनाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पुत्राच्या स्मृती जपण्यासाठी पालकांचे दातृत्व ; मंदिरासाठी एकर जमीन दान

## चंदनवाडी येथे श्री तेजस्वी महादेव मंदिराचा भूमिपूजन सोहळा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

तालुक्यातील चंदनवाडी येथील रहिवासी असलेले श्री.अरूण वसंतराव गित्ते आणि सौ.कौशल्या अरूणराव गित्ते यांनी आपल्या दिवंगत तरूण मुलगा तेजस याच्या स्मृतीप्रित्यर्थ एक सामाजिक आणि धार्मिक आदर्श समाजासमोर ठेवला आहे. तेजस याचे गतवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी ह्रदय विकाराने दुर्दैवी अकाली निधन झाले होते. या दुःखद घटनेतून सावरत असतानाच, आपल्या लाडक्या लेकाची आठवण कायमस्वरूपी जपली जावी, या उदात्त हेतूने त्यांनी चंदनवाडी (ता.अंबाजोगाई) गावातील नियोजित श्री तेजस्वी महादेव मंदिरासाठी गावालगत असलेली एक एकर जमीन दान केली आहे.

स्व.तेजस अरूणराव गित्ते (वय २१ वर्षे) हा पुणे येथे बी.कॉम पदवीचे शिक्षण घेत होता. तो शिवभक्त होता. भगवान महादेववर त्याची नितांत श्रद्धा होती. अतिशय देखणा, उमदा, आई–वडिलांचा आज्ञाधारक असलेल्या तेजस याचे गतवर्षी ऐन महाशिवरात्रीच्या दिवशी ह्रदय विकाराने दुर्दैवी अकाली निधन झाले होते. आपल्या तरूण मुलाच्या निधनानंतर त्याच्या स्मृती कायमस्वरूपी जतन करण्यासाठी अंबाजोगाई तालुक्यातील चंदनवाडी येथील रहिवासी असलेले श्री.अरूण आणि सौ.कौशल्या अरूणराव गित्ते यांनी एक सामाजिक आणि धार्मिक आदर्श समाजासमोर ठेवत मंदिराला एक एकर जमीन दान केली आहे. नुकताच या नियोजित मंदिराचा भूमिपूजन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या नियोजित श्री तेजस्वी महादेव मंदिरामुळे गावाच्या विकासाला चालना आणि श्रद्धेला हातभार लागणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दान केलेली ही जमीन मंदिरासाठी वापरली जाणार आहे. मुलाच्या निधनानंतर सुतकात न बसता, त्याच्या नांवाने काहीतरी चांगले घडावे असा विचार या दांपत्याने केला. गित्ते कुटुंबाच्या या निर्णयामुळे संपूर्ण गावातून त्यांचे कौतुक होत आहे. मुलाचे जाणे ही जरी मोठी हानी आहे, पण त्याच्या नांवाने होणारे हे कार्य अनेकांच्या उपयोगी पडेल, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. गावकऱ्यांच्या वतीने या दात्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) यांनी सांगितले की, आजचा हा दिवस आपल्या चंदनवाडी गावासाठी अत्यंत पवित्र आणि अभिमानाचा क्षण आहे. भगवान शिव यांच्या कृपेने आपण सर्वजण महादेव मंदिराच्या भूमिपूजनासाठी येथे एकत्र आलो आहोत. पण, हा फक्त मंदिराचा भूमिपूजन सोहळा नाही. तर हा एका लेकराच्या स्वप्नाचा, त्याच्या श्रद्धेचा आणि त्याच्या नितळ भावनेचा साक्षीदार असलेला क्षण आहे. कै.तेजस अरूण गित्ते या तरूण, उमद्या लेकराच्या मनात एक पवित्र विचार होता की, देवासाठी माझं शेत अर्पण करायचं. आज तो आपल्यामध्ये नाही, ही वेदना मनाला चटका लावणारी आहे. परंतू, त्याचे शब्द, त्याची भावना आणि त्याचं स्वप्न आजही जिवंत आहे. कारण, त्याच्या गित्ते कुटुंबियांनी त्या स्वप्नाला मान दिला, त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी देवाला जागा अर्पण केली. ही केवळ जमीन नाही. तर यापुढे ही श्रद्धेची भूमी आहे. ही त्यागाची भूमी आहे, ही एका मुलाच्या पवित्र स्वप्नाची भूमी आहे. एखादं स्वप्न पाहणं मोठं असतं. पण, ते स्वप्न पूर्ण




करण्यासाठी कुटुंबाने पुढे येणं, हा त्याहून मोठा त्याग असतो. आज तेजसच्या कुटुंबाने दाखवलेली ही उदारता संपूर्ण गावासाठी प्रेरणादायी आहे. उद्या जेव्हा या ठिकाणी भव्य श्री तेजस्वी महादेव मंदिर उभं राहील, जेव्हा घंटानाद होईल, आरती होईल, तेव्हा प्रत्येक भक्ताच्या ओठांवर एकच भावना असेल, हे मंदिर एका लेकराच्या श्रद्धेचं फळ आहे. कै.तेजस आज देहाने जरी आपल्या सोबत नसला, तरी त्याचं स्वप्न या मंदिराच्या प्रत्येक दगडात, प्रत्येक विटेत जिवंत राहील. त्याचं नांव गावाच्या इतिहासात कायमस्वरूपी कोरलं जाईल. चला, आपण सर्वजण मिळून प्रार्थना करूया महादेवाच्या चरणी त्या पवित्र आत्म्यास शांती लाभो आणि हे मंदिर गावाच्या ऐक्याचं, श्रद्धेचं आणि विकासाचं प्रतीक बनो. हर–हर महादेव..! असे जिल्हाध्यक्ष ॲड.चव्हाण म्हणाले. यावेळी सूर्यभान मुंडे (सभापती, परळी वैजनाथ) यांच्यासह चंदनवाडी येथील समस्त गावकरी मंडळी व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

# मनिषा तोकले यांना भारतरत्न सी . सुब्रमण्यम पुरस्कार प्रदान




बीड /प्रतिनिधी

जागर प्रतिष्ठान, ऊसतोड कामगार महीला संघटनेच्या माध्यमातून मनिषा तोकले यांनी गेली तिस वर्ष सामाजिक क्षेत्रात कार्य केलेले आहे. समाजातील दलित , आदिवासी, महीला, उसतोड कामगार, आत्महत्या ग्रस्त शेतकरी परिवारातील महीलांच्या हक्कासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी हा पुरस्कार मनिषा तोकले यांना प्रदान करण्यात आला.

मनिषा तोकले यांनी २९ सप्टेंबर १९९३ साली किल्लारी जि लातूर येथे झालेल्या विनाशकारी भुकंपामध्ये भुकंपग्रस्त लोकांसोबत पुनर्वसनासाठी कार्य केले आहे. ऊसतोड कामगार महीलांच्या गर्भ पिशवीचा प्रश्न मनिषा तोकले यांनी जागतिक पातळीवर हाताळला. ऊसतोडणी बंद व्हावी म्हणून महीलांना कमी खर्चात शेती कशी करावी हे शिकवले, बीड तालुक्यातील काठोडा व घोडका राजूरी येथील महीला कमी खर्चाची शेती करून त्यांनी उसतोडणी थांबलेली आहे. महीला किसान अधिकार मंच सोबत राहुन मनिषा तोकले यांनी आत्महत्या ग्रस्त शेतकरी परिवारातील महीलांसोबत कार्य केलेले आहे.मानवी हक्क अभियान संघटनेत सहभागी होवून दलित अत्याचार, गायरान धारकांसाठी कार्य केले. ऊसतोड कामगार महीलांची आरोग्य तपासणी करावी, महीलांना स्वतंत्र पणे मजूर म्हणून ओळखपत्र द्यावी, ऊसतोड कामगार महीलांचा विमा उतरवावा, या मागण्या शासनासमोर मांडण्यासाठी त्यांनी महीला ऊसतोड कामगार संघटनेची निर्मिती केली. बालविवाह थांबविण्याच्या लढ्यात त्या सहभागी आहेत. या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना हा नॅशनल फौंडेशन फार इंडीया यांच्यामार्फत भारत रत्न सी. सुब्रमण्यम सामाजिक नेतृत्व पुरस्कार २०२५/२६ हा पुरस्कार देण्यात आला. दीनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी हबिटेट सेन्टर नवी दिल्ली येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मनिषा तोकले यांना माजी आय एम एस अधिकारी व नॅशनल फौंडेशन फार इंडीयाचे चेअरमन सत्यानंद मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात द. इक्वालिटी प्रकल्पाचे जागतिक समन्वयक पाल दीवाकर, आय ए एस अधिकारी डॉ रश्मी सिंघ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये स्मृती चिन्ह सन्मान पत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.दीली येथे झालेल्या या कार्यक्रमात दीलीतील सामाजिक क्षेत्रातील नामवंत कार्यकर्ते, नेते उपस्थित होते.




मुंबई – यशवंतराव चव्हाण नाट्यगृह नरिमन पॉईंट मुंबई येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. घुबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. साबळे यांच्या वतीने डॉ. भगत मॅडम आणि पात्रूड प्रा. आ. केंद्रातील वै. अधिकारी डॉ. अमोल मायकर आणि आशा शितल ठोंगे यांनी आरोग्य सेवेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर आणि राज्य मंत्री मेघना बोर्डीकर मॅडम यांच्या हस्ते वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# विश्व हिंदु परिषदेच्या बीड शहरमंत्री पदी प्रशांत डोरले यांचे नाव घोषित

बीड प्रतिनिधी

विहिंप प्रांत मंत्री गर्गेजी यांच्या सुचनेनुसार संतोष कुलकर्णी व किशोर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्याचे सहजिल्हामंत्री पदी गणेश गुरखुदे यांची तर बीड शहर व ग्रामीण भागाची जबाबदारी म्हणून बीड शहरमंत्री पदाची जबाबदारी प्रशांत डोरले यांच्याकडे सोपविण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

बीड जिल्ह्यात गोरक्षा विभागाच्या माध्यमातून विविध संमेलने, हिंदू धर्मजागृती कार्यक्रम, तसेच लव्ह जिहाद आणि धर्मांतरण विरोधी कायद्याच्या मागणीसाठी मोर्चे व आंदोलने आयोजित करण्यात विहिंपने पुढाकार घेतल्याचा आढावा यावेळी सादर करण्यात आला. अवैध गौहत्या रोखण्यासाठी आणि संबंधित



मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेण्याबाबतही कार्याचा उल्लेख करण्यात आला. काही ऐतिहासिक व सांस्कृतिक विषयांवर संघटनेने घेतलेल्या भूमिकेचाही बैठकीत उल्लेख झाला.

यावेळी बैठकीसाठी बीड, गेवराई, वडवणी, आष्टी, पाटोदा, शिरूर का. तालुक्यातील विश्व हिंदू परिषदेच्या प्रमुख पदाधिकारी व बजरंग दलाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

हिंदू समाजाच्या प्रश्नांवर तडजोड नाही – प्रशांत डोरले

संघटन विस्तार आणि हिंदू समाजाच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेऊ. शहरातील प्रत्येक भागातील हिंदू युवकांचे एकत्रीकरणाचे जाळे अधिक मजबूत केले जाईल आणि समाजहिताच्या प्रश्नांवर सक्रियपणे भूमिका घेतली जाईल. कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करत आगामी काळात विविध जनजागृती उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.




# मराठा सेवा संघाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित

बीड /प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ च्या वतीने दि.२० रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे दिमाखदार सोहळ्यात सामाजिक क्षेत्रातील प्रामाणिक व विशेष कार्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सुप्रसिद्ध व्याख्याते हनुमंत पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी राजर्षी शाहू बँकचे अध्यक्ष अजय पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे तसेच मराठा सेवा संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी चळवळीतील सहकारी रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे, रामधन जमाले, पांडुरंग हराळे, डी.जी. तांदळे, धनंजय सानप, बाजीराव ढाकणे,राजकुमार कदम, अँड.करूणा टाकसाळ, कोमल मस्के, शिवमती वर्षा माने आदींची उपस्थिती होती.




# ना जातीचे ना पातीचे शिवाजी महाराजांनी रक्षण केले अखंड हिंदुस्तानच्या मातीचे – सचिव शरद गदळे

बीड /प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेचे सचिव शरद शामराव गदळे यांनी साखर कारखान्यावर जाऊन ऊसतोड कामगारांना बरोबर घेऊन शिवजयंती साजरी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकरी, कष्टकरी कामगार व सर्वसामान्य जनता यांचे हित जोपासले म्हणून यावर्षी सचिव शरद गदळे यांनी ठरवले की, ऊसतोड कामगारांना व शेतकऱ्यांना बरोबर घेऊन शिवजयंती साजरी करायची. त्यानुसार त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रथम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना संबोधित करत असताना शरद गदळे म्हणाले की, महाराजांनी जातीयतेच्या भिंती तोडून हिंदवी स्वराज्य उभे केले आणि अखंड हिंदुस्तानच्या मातीचे हिंदू धर्माचे रक्षण केले. आज त्यांच्या विचाराची आचाराची गरज आहे. यावेळी शिवाजी महाराज हे शिवभक्त असल्यामुळे ज्याला की महादेवाचा नंदी म्हणून संबोधतात अशा बैलाची ही विशेष उपस्थिती लावली होती. याप्रसंगी आणि ऊसतोड कामगार, उप मुकादम व शेतकरी उपस्थित होते अशी माहिती प्रसार माध्यमांना मा. सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे.




हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी–३ एम.आय.डी.सी.बीड–४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF WEEKLY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)

# आष्टीच्या कृषी प्रदर्शनात ‘चायना झिंग’ बोकडची जोरदार चर्चा

## दीड लाखांच्या सुलतानकडे शेतकऱ्यांची गर्दी

आष्टी – (प्रतिनिधी)

माजी आ. भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन मध्ये यंदा एक वेगळेच आकर्षण ठरले आहे. चायना झिंग या नावाने ओळखला जाणारा, दीड लाखांपेक्षा अधिक किमतीचा देखणा बोकड सुलतान याने प्रदर्शनात येणाऱ्या शेतकरी व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

सुमारे दोन फूट उंचीचा, सव्वादोन फूट लांबीचा, सव्वा फूट लांब शिंगे असलेला आणि तब्बल २५ किलो वजनाचा हा बोकड पूर्ण अंगावर लांबसडक केसांनी मढलेला असून त्याची ठेवण अत्यंत आकर्षक आहे. चीनमधील या विशेष जातीच्या बोकडाला पाहण्यासाठी प्रदर्शनस्थळी मोठी गर्दी होत आहे. शेतकरी वर्गात त्याच्या संगोपन, खाद्य व्यवस्थापन आणि बाजारमूल्याबाबत उत्सुक चर्चा रंगताना दिसत आहे.



यंदाच्या प्रदर्शनाचे नियोजन पंधरा वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या वाबळेज इव्हेंट कंपनी यांनी अत्यंत सूक्ष्म पद्धतीने केले आहे. प्रदर्शनात ट्रॅक्टर, शेती अवजारे, ब्लोअर, अत्याधुनिक फवारणी यंत्रे, शेतीमाल प्रक्रिया उपकरणे, पशुखाद्य, शेततळे विषयक माहिती, खते, बी-बियाणे, कीडनाशके तसेच गृहपयोगी इलेक्ट्रिक साधनांचे स्टॉल्स यांचा समावेश आहे. याशिवाय खाऊ गल्ली आणि विविध मनोरंजन कार्यक्रमांमुळे कुटुंबांसह नागरिकांची उपस्थिती लक्षणीय वाढली आहे.

गेल्या तीन-चार दिवसांत प्रदर्शनाला भरघोस प्रतिसाद मिळाला असून सोमवार हा शेवटचा दिवस असल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांनी उपस्थित राहून आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी, असे आवाहन युवा नेते अजयदादा धोंडे तसेच शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडसूळ यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान थेट त्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्याची नवी चळवळ या कृषी प्रदर्शनातून सुरू झाली असून याला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, याचा निश्चित आनंद आहे. यंदाचे डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन हे हटके स्वरूपाचे ठरले असून प्रतिसाद समाधानकारक आहे, अशी माहिती अजय वाबळे, सीईओ, वाबळेज इव्हेंट मॅनेजमेंट यांनी दिली. एकूणच, शेती आणि पशुपालन क्षेत्रातील नव्या संधींची ओळख करून देणारे हे प्रदर्शन आष्टी तालुका व बीड जिल्ह्यासाठी मार्गदर्शक ठरत असून चायना झिंग सुलतानमुळे यंदाच्या प्रदर्शनाला विशेष उठाव प्राप्त झाला आहे.

# युवा नेते मा.राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त १२१ तरुणांचे रक्तदान

## रक्तदान हेच जीवनदान उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

आष्टी – (प्रतिनिधी)

रक्तदान हेच जीवनदान आणि रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या उक्तीला सार्थ ठरवत आष्टी येथे युवा नेते तथा जामगावचे सरपंच मा. राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या शिबिरात तब्बल १२१ तरुण रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत मानवतेचा वसा पेलला.

राज्यातील विविध रक्तपेढ्यांमधील रक्तसाठा कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवस साजरा करण्याची पारंपरिक पद्धत बाजूला ठेवत समाजोपयोगी कार्यातून आनंद साजरा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शिबिराला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे रक्तदान करणाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात युवकांचा सहभाग होता. त्यामुळे तरुण पिढीतील सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना अधोरेखित झाली.



रक्तदान केल्यानंतर सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी मा. राधेश्याम भैय्या धस मित्र परिवार, आष्टी तालुका व अहिल्यानगर येथील सुरभी रक्तपेढीचे डॉ. राजेंद्र पवार यांचे सहकार्य लाभले. तसेच शिवम खिल्लारे, राहुल जरे, आदित्य जगताप, सोनिया शितोळे, प्रिती ढोबळे, प्रतिक्षा घावते, मयूर पवार, ज्ञानदेव सांगळे, प्रणाली लिपणे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी बोलताना मा. राधेश्याम भैय्या धस यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजासाठी असे वेगळे आणि उपयुक्त योगदान देता आले, याचा आनंद व्यक्त केला. रक्तदानासारख्या महान कार्यासाठी पुढे येणाऱ्या सर्व तरुणांचे त्यांनी आभार मानले. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांना चालना देत समाजहिताचे कार्य सातत्याने करत राहण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे केवळ वाढदिवस साजरा झाला नाही, तर अनेक गरजू रुग्णांना नवजीवन देण्याचा मार्गही मोकळा झाला. सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि तरुणाईची सकारात्मक ऊर्जा यांचा संगम या रक्तदान शिबिरातून अनुभवायला मिळाला.

# आष्टी तालुक्याची कामधेनू पुन्हा धावणार

## महेश सहकारी साखर कारखाना पुढील गळीत हंगामात सुरू होणार-मा.आ.भीमराव धोंडे

आष्टी – (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्याची कामधेनू मानला जाणारा महेश सहकारी साखर कारखाना मागील तब्बल १३ वर्षांपासून बंद अवस्थेत होता. मात्र आता नव्या संचालक मंडळाच्या नेतृत्वाखाली कारखान्याच्या पुनरुज्जीवनाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून येत्या गळीत हंगामात कारखाना सुरू होणार असल्याचा ठाम विश्वास माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी व्यक्त केला.

रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी कारखाना परिसरात श्रीफळ वाढवून मिल, बॉयलर व डिजीसेटचे विधीवत पूजन करण्यात आले. वेदमंत्रांच्या उच्चारात पार पडलेल्या या पूजनानंतर मशिनरी दुरुस्ती व ओव्हरइलिंगच्या कामाचा शुभारंभ मा.आ. भीमरावजी धोंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कारखाना परिसरात आशादायी वातावरण निर्माण झाले होते.

नव्या संचालक मंडळाने कारखान्याची थकीत कर्जे भरून तो ताब्यात घेतला असून शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे. अनेक वर्षे बंद अवस्थेत असल्यामुळे कारखान्यात मोठ्या प्रमाणावर दुरुस्तीची कामे करावी लागणार आहेत. पुढील सहा ते सात महिन्यांत सर्व कामे पूर्ण करून पुढील गळीत हंगामात कारखाना सुरू करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना मा.आ. भीमरावजी धोंडे म्हणाले, कारखाना अनेक वर्षे बंद असल्याने मोठे आव्हान आहे. मात्र आपण सर्वांनी एकत्र येऊन ही वास्तू टिकवायची आहे. जर परवाना मिळाला नसता तर काही लोकांच्या डावाप्रमाणे हा कारखाना भंगारात विकावा लागला असता. मात्र शेतकऱ्यांच्या पाठिंब्यामुळे आपण तो वाचवू शकलो. आता सर्वांनी ऊस उत्पादन वाढवून कारखान्याला बळ द्यावे.



शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, ऊसाच्या सुमारे २५ नवीन जाती उपलब्ध झाल्या आहेत. लखनऊ येथून ७३१८१ या वाणाचा नमुना मागविण्यात आला असून त्याचे सरासरी उत्पादन प्रतिएकर १०० टनांपर्यंत असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रायोगिक तत्त्वावर रोपे व बेणे उपलब्ध करून देण्याबाबत लखनऊ येथील संबंधित अधिकाऱ्यांकडे विनंती करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी नव्या वाणांची लागवड करून अधिक उत्पादन घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कारखाना सुरू झाल्यास परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. अनेक वर्षांपासून कारखाना बंद असल्याने परिसराच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला होता. नव्या व्यवस्थापनामार्फत आवश्यक प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमास अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, राजू काका धोंडे, नियामत बेग, ॲड. हनुमंत थोरवे, आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे, राजाराम ननवरे, स्वीकृत सदस्य बबनराव औटे, हरिभाऊ जंजिरे, सोनाजी गांजुरे, लांडगे मामा, पांडुरंग गावडे, शहादेव गर्जे, नानाभाऊ वाडेकर, अंकुश मुंडे, बजरंग कर्डिले, सरपंच दादा जगताप, सुनिल शिंदे, कुंडलिक आस्वर, पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार संजय खंडागळे, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार अक्षय विधाते, छायाचित्रकार शरद गर्जे, संचालक बाबासाहेब आंधळे यांच्यासह कार्यकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी व कामगार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


पूजन सोहळ्यामुळे परिसरात नवचैतन्य निर्माण झाले असून शेतकरी व नागरिकांनी कारखाना लवकरात लवकर सुरू व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आष्टी तालुक्याच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाचा ठरणारा हा साखर कारखाना पुन्हा कार्यरत होण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल उचलले गेल्याने तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कु.डॉ.प्राजक्ता जगताप यांना एम.डी. (पॅथॉलॉजी) प्रवेश; आ.सुरेश धस यांच्याकडून गौरव

आष्टी – (प्रतिनिधी)

पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंग येथील माजी विद्यार्थिनी तथा आदर्श शिक्षक श्रीराम जगताप यांची कन्या कु. डॉ. प्राजक्ता श्रीराम जगताप यांनी एम.बी.बी.एस. शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून पुढील उच्च शिक्षणासाठी शासकीय मेडिकल कॉलेज, अकोला येथे एम.डी. (पॅथॉलॉजी) अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कु. डॉ. प्राजक्ता यांनी शालेय जीवनापासूनच अभ्यासात सातत्य, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर प्रगती साधली. एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण करताना त्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेसह यश संपादन केले. वैद्यकीय क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवण्याच्या उद्देशाने त्यांनी पॅथॉलॉजी या शाखेची निवड केली असून, समाजोपयोगी सेवा देण्याचा त्यांचा निर्धार आहे. त्यांच्या



या यशाबद्दल मराठवाडा भूषण आ. सुरेश धस यांनी त्यांचा सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात झेप घेतल्याचे कौतुक करत, डॉ. प्राजक्ता यांचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी राजेंद्र दहातोंडे, विनोद नाना रोडे तसेच पालक श्रीराम जगताप उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही कु. डॉ. प्राजक्ता यांच्या परिश्रमांचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. कु. डॉ. प्राजक्ता जगताप यांच्या या यशामुळे टाकळसिंग गावासह संपूर्ण परिसराचा गौरव वाढला असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# सांगवी पाटणमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## भव्य मिरवणूक,सांस्कृतिक कार्यक्रम व कीर्तनातून स्वराज्याचा जागर

आष्टी – (प्रतिनिधी)

तालुक्यातील सांगवी पाटण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात वारकरी संप्रदायाचे विद्यार्थी, गावातील नागरिक, माता-भगिनी, युवक तसेच सर्व जाती-धर्मातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेद्वारे अत्याचारी सत्तेला आव्हान देत लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचा आदर्श निर्माण केला. गनिमी काव्याचे प्रभावी युद्धतंत्र, किल्ल्यांची उभारणी, जलसंधारण, व्यापार-उद्योगांना चालना आणि सक्षम प्रशासन व्यवस्था या माध्यमातून त्यांनी दूरदृष्टीचे नेतृत्व दाखवून दिले. सर्व समाजघटकांना एकत्रित घेऊन उभे केलेले



त्यांचे प्रशासन आजही प्रेरणादायी मानले जाते. याच विचारांच्या प्रेरणेने सांगवी पाटण येथे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळेतून छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा पालखीतून गावातून वाजत-गाजत मिरवण्यात आली. सुदर्शन विद्यालय व सार्वजनिक गणेश उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महंत काशिनाथ शास्त्री महाराज यांच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावकऱ्यांनी फुगडी व लेझीम सादर करून पारंपरिक रंगत वाढवली, तर शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर नृत्य सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. मिरवणूक ग्रामपंचायत कार्यालयासमोर आल्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. त्यानंतर महाआरती पार पडली. दोन्ही शाळांच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सायंकाळी ७ ते ९ या वेळेत भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांचे कीर्तन झाले. कीर्तनात त्यांनी स्पष्ट केले की, छत्रपती शिवाजी महाराज कोणत्याही जाती-धर्माच्या विरोधात नव्हते; ते अन्याय व अत्याचाराच्या विरोधात होते. त्यांच्या सोबत सर्व समाजघटकांचे मावळे होते. त्यांच्या चारित्र्यातून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी. कीर्तनानंतर उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमातून सामाजिक सलोखा, एकोपा आणि स्वराज्याच्या विचारांप्रती असलेली निष्ठा अधोरेखित झाली.

# छत्रपती संभाजी राजे विद्यालयाच्या परीक्षा केंद्राला गटशिक्षणाधिकारी यांची भेट

मंठा । प्रतिनिधी

दहावीच्या सार्वजनिक परीक्षेला शुक्रवार, दि. २० पासून सुरुवात झाली असून पहिलाच मराठी विषयाचा पेपर छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडला. पेपरदरम्यान कोणताही गैरप्रकार आढळून आला नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.या परीक्षा केंद्राला मंठा येथील गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांनी भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची पाहणी केली.



यावेळी केंद्रप्रमुख शिवाजी देशमुख, कारभारी ढाकणे आदी उपस्थित होते.परीक्षा तणावमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी प्रत्येक वर्गखोलीत तसेच शाळा परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. याबाबतची माहिती केंद्र संचालक इर्शाद खान खान पठाण यांनी दिली.दरम्यान, मंठा पोलीस स्टेशन यांच्या वतीनेही परीक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# समीर शेख यांचा १२ वर्षांचा अखंड उपक्रम

आष्टी – (प्रतिनिधी) तालुक्यातील सांगवी पाटण येथील उच्चशिक्षित युवक समीर शेख गेल्या बारा वर्षांपासून शिवज्योत पायी आणण्याचा प्रेरणादायी उपक्रम सातत्याने राबवत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमी असलेल्या शिवनेरी किल्ला येथून सांगवी पाटणपर्यंत सुमारे २०० किलोमीटरचा पायीप्रवास करून ते शिवज्योत गावात आणतात. या उपक्रमातून समाजात एकता, बंधुता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर दूरदृष्टी असलेले आदर्श राज्यकर्ते आणि कुशल प्रशासक होते. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य सामाजिक समता, न्यायनिष्ठ प्रशासन आणि लोककल्याणाचा आदर्श मानले जाते. जाती-धर्माचा भेद न करता गुणवत्तेला प्राधान्य देणारी व्यवस्था त्यांनी उभी केली. प्रजेचे राज्य प्रजेसाठी हा विचार प्रत्यक्षात उतरवत हिंदवी स्वराज्याची भक्कम पायाभरणी त्यांनी केली. समीर शेख यांचा उपक्रम हाच वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे.

यंदाही समीर शेख यांनी ओंकार खिलारे, दादा इरले व गावातील मावळ्यांसह जवळपास २०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. एम.एस्सी., बी.एड., एम.एड. अशी शैक्षणिक पात्रता असलेले समीर शेख समाजाभिमुख व प्रगत विचारांचे युवक म्हणून परिचित आहेत. शिवनेरीवरून प्रस्थान करताना जुन्नर



नगरपंचायत यांच्या वतीने त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच धामणगाव येथे शिवज्योत आगमनानंतर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी स्वागत करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी समीर शेख यांनी भावना व्यक्त करताना सांगितले, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना कधीही जाती-धर्माचा भेद केला नाही. अठरा पगड जातींना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्य उभारले. मी अभिमानाने सांगतो, मी छत्रपतींचा मुस्लिम मावळा आहे. त्यांच्या या विधानातून सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा स्पष्ट संदेश दिसून येतो. समीर शेख गेल्या आठ वर्षांपासून भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्यानिमित्त वाराणसी (काशी) येथून गंगाजल आणण्याची परंपराही जपत आहेत. तसेच बारा वर्षांपासून शिवनेरी ते सांगवी पाटण शिवज्योत पायी आणण्याचा उपक्रम अखंडपणे सुरू ठेवला आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्यामुळे गावात आणि परिसरात त्यांच्याबद्दल आदराची भावना व्यक्त केली जाते. या उपक्रमात विविध जाती-धर्मातील युवकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. सामाजिक सलोखा, एकात्मता आणि शिवरायांच्या विचारांचा प्रसार हा या पायप्रवासाचा मुख्य हेतू आहे. ग्रामस्थांच्या मते, हा उपक्रम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जिवंत वारसा जपण्याचा प्रयत्न असून नव्या पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. समीर शेख यांचा हा उपक्रम केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम नसून सामाजिक ऐक्य, बंधुभाव

# प्रशासनाच्या 'ढिम्म' पणामुळे जाफराबादकरांचा संताप

## पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर सट्टा-मटका अन् गुटख्याचा सुळसुळाट!

जाफराबाद ।प्रतिनिधी

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या प्रसारमाध्यमांनी जाफराबाद तालुक्यातील अवैध धंद्यांचे वाभाडे काढूनही, स्थानिक पोलीस प्रशासनावर याचा काडीचाही परिणाम झालेला दिसत नाही. उलट, तुम्ही बातम्या लावा, आम्ही हप्ते घेतो अशा अविर्भावात अवैध धंदेवाल्यांचे मनोबल वाढल्याचे चित्र दिसत आहे. जाफराबाद शहर आणि तालुक्यात कायद्याचा धाक उरला नसून, आता जनतेने न्यायासाठी कुणाकडे पाहायचे? असा संतप्त सवाल नागरीकांनाच्या वतीने उपस्थित होत आहे.

बातम्यांची रद्दी आणि पोलिसांची 'सोयीस्कर' झोप

काही दिवसांपूर्वीच जाफराबादमधील सट्टा-मटका, विषारी गुटखा आणि गावठी दारूच्या विक्रीबाबत दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्रात सविस्तर वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र, या बातम्यांची दखल घेण्याऐवजी जाफराबाद पोलिसांनी जणू 'कुंभकर्णी' झोप घेतली आहे. पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर आणि तहसील कार्यालयाच्या डोळ्यासमोर सट्ट्याचे आकडे लावले जात आहेत. बंदी असलेला गुटखा एखाद्या रेशनच्या मालासारखा खुलेआम विकला जात असताना, पोलिसांच्या गाड्या मात्र त्याच रस्त्यावरून 'डोळे मिटून' जात असल्याचा आरोप संतप्त नागरिक करत आहेत.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर बातम्या प्रसिद्ध होऊनही जर कारवाई होत नसेल, तर याचा अर्थ स्पष्ट आहे - वरपासून खालपर्यंत मलिदा पोहोचतोय का?. जाफराबादच्या बसस्थानकापासून ते अहिल्यादेवी होळकर चौकापर्यंत अवैध धंद्यांचे जाळे पसरले आहे. तरुणाई बरबाद होत आहे, महिलांचा आक्रोश वाढला आहे, पण खाकी वर्दीला याचे सोयरसुतक नसल्याचे दिसत आहे. तक्रार करणाऱ्या नागरिकांनाच धाक दाखवला जात असेल, तर हे लोकशाहीचे रक्षणकर्ते आहेत की अवैध धंदेवाल्यांचे 'बॉडीगार्ड'?

जिल्हा पोलीस अधीक्षकांनो, आता तरी 'सर्जिकल स्ट्राईक' करा नागरिकांची मागणी....

स्थानिक पोलिसांकडून जाफराबादकरांना आता कोणतीही अपेक्षा उरलेली नाही. आधा तुम्हारा, आधा हमारा या तत्त्वावर जाफराबाद पोलीस ठाण्याचे कामकाज सुरू आहे की काय? अशी शंका आता जनमानसात घर करू लागली आहे. त्यामुळे आता खुद्द जिल्हा पोलीस अधीक्षकांनीच यात हस्तक्षेप करून, या 'अवैध साम्राज्या'वर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या भ्रष्ट खाकी वर्दीवर 'सर्जिकल स्ट्राईक' करण्याची वेळ आली आहे. असा प्रश्न नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे . चालु असलेले अवैध धंदे बंद करा नसता यांचें परिणाम भोगावे लागतील असा इशारा अजय बनकर यांनी दिला.

अजय बनकर

तालुका अध्यक्ष काँग्रेस जाफराबाद



## नांदर ग्रामपंचायत मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी....!

दावरवाडी ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी नांदर ग्रामपंचायत मध्ये करण्यात आली १९ फेब्रुवारी म्हणजे आनंद उत्सव निर्माण करणारा दिवस प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ग्रामपंचायत मधील सरपंच उपसरपंच व कर्मचारी गावातील नागरिक यांनी वंदना करण्यात आली त्यावेळी उपस्थिती सरपंच विजय गायकवाड उप सरपंच आसमानराव काळे ग्रामसेवक खंडूजी वीर मा.उ.स.रेवनाथ कर्डिले यशवंतराव काळे प्रविन काळे शिवाजीराव मगरे दादासाहेब सोनवणे नजीर बेग कचरु नाचन रवींद्र गायकवाड ईश्वर भोसले व गावातील नागरिक ग्रामपंचायत सर्व कर्मचारी यावेळी हजर होते

## समानता नियमावलीला जाफराबाद श्री संताजी महाराज तेली संघटनेकडून समर्थन



जाफराबाद हरी भालके

उच्च शिक्षण क्षेत्रात सामाजिक न्याय व समावेशकतेला बळ देणाऱ्या युनीव्हर्सिटी ग्रँटस कॉ मिशनच्या समानता नियमावली २०२६ निर्णयाला चाळीसगाव येथे ठाम समर्थन देत महाराष्ट्रात तात्काळ अंमलबजावणीची जोरदार मागणी करण्यात आली. श्री संताजी महाराज अखिल भारतीय तेली समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व संस्थापक अनिल विठोबा बजाईत यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करण्यात आले.

१५ जानेवारी २०२६ पासून लागू झालेल्या नव्या तरतुदीनुसार देशातील उच्च शिक्षण संस्थातील समानता समित्यांमध्ये महिला, इतर मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग घटकांना प्रतिनिधित्व देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सामाजिक समतोल आणि न्याय्य शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी हा निर्णय ऐतिहासिक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. संघटनेचे तालुकाध्यक्ष सुनिल साळवे तथा , जिल्हाध्यक्ष रवी टोपे यांनी निवेदनात नमूद केले की, यापूर्वी अनेक संस्थांमध्ये इतर मागास प्रवर्गाचे प्रतिनिधित्व नसल्याने विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना भेदभावाच्या तक्रारींना सामोरे जावे लागत होते. मूल्यमापन प्रक्रियेत पारदर्शकता व समानतेचा अभाव असल्याची भावना समाजात निर्माण झाली होती. नव्या नियमानुसार समानता समित्यांमध्ये इतर मागास प्रवर्गातील सदस्यांचा समावेश केल्याने जातीय भेदभावाविरुद्ध प्रभावी यंत्रणा उभी राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तेली, माळी, कुणबी यांसारख्या इतर मागास समाजघटकांना संविधानिक हक्कांनुसार न्याय मिळावा आणि उच्च शिक्षणात संधीची समानता सुनिश्चित व्हावी, यासाठी केंद्र शासनाचा हा निर्णय महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. केंद्र शासनाच्या या धोरणाचे स्वागत करत महाराष्ट्र शासनानेही विलंब न करता राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये समानता नियमावली २०२६ ची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. तहसीलदार मंगेश साबळे यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्याक्ष रवि टोंपे तालुकाध्यक्ष सुनिल साळवे, उपाध्यक्ष शरद टोंपे आदी मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने समाज बांधवांनी हजेरी लावून निर्णयाला समर्थन दर्शविले. उच्च शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सामाजिक न्यायाची अंमलबजावणी केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात उतरावी, यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे. आता राज्य शासन या मागणीची कितपत दखल घेते, याकडे समाजाचे लक्ष लागले आहे.

## विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी

### विद्यार्थ्यांत जागृत झाली देशभक्तीची ज्वाला

अंबड ।प्रतिनिधी

शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अत्यंत उत्साहात भक्तिभावाने आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.स्वराज्याचे स्वप्न साकार करणाऱ्या महान शिवरायांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह पालक,शिक्षक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब अंबडचे अध्यक्ष तथा पार्थ हॉस्पिटलचे संचालक मा.डॉ.लक्ष्मण सावंत सर उपस्थित होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवव्याख्याते मा. अमोल पाष्टे सर आणि संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष मा.विनोद जाधव सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.




यावेळी अष्टविनायक मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक मा. गणेश बोबडे,नगरसेवक तथा आरोग्य व स्वच्छता सभापती मा.सचिन खरात, दैनिक महाराष्ट्र सर्वांचा चे कार्यकारी संपादक व पत्रकार,जयभवानी मंगलकार्यालयाचे संचालक मा. उमेश भवर,तसेच नगरसेवक कुमारभाऊ रूपवते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. संस्थेचे संचालक श्री. संजय जाधव सर यांनी प्रास्ताविकातून शिवजयंतीचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना शिवरायांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

शाळेतील विद्यार्थी सोहम भुकेले याने प्रभावी भाषण करून उपस्थितांची विशेष दाद मिळवली. मार्गदर्शक मा. अमोल पाष्टे सर आणि मा. विनोद जाधव सर यांनी शिवचरित्र स्वराज्य स्थापनेचा इतिहास आणि महाराजांचे आदर्श जीवनकार्य यावर प्रेरणादायी विचार मांडले. त्यांच्या भाषणातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, स्वाभिमान आणि नेतृत्वगुण जागृत झाल्याचे पाहायला मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. योगेश हरणे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षक श्री. प्रमोद मस्के सर यांनी केले. यावेळी श्री. संजय जाधव सर, श्री. प्रमोद मस्के सर, श्री. योगेश हरणे सर, सौ. शितल जाधव मॅडम, सौ. योगिता शिंदे मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## शहागडमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



### शहागड युवा संघर्ष समितीकडून शिवरायांना भावपूर्ण अभिवादन

शहागड ।प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अंबड तालुक्यातील शहागड येथे शहागड युवा संघर्ष समितीच्या वतीने शिवजयंती अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात एडवोकेट गणेश शिंदे,इमरान पठाण,संतोष हरेर, भाऊदिन सौदागर,रशीदभाई सय्यद यांच्यासह अनेक मान्यवर युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून शिवरायांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम,शौर्य, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकीची भावना जागृत व्हावी,या उद्देशाने विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शिवाजी महाराजांचे जीवनकार्य,पराक्रम,स्वराज्य संकल्पना आणि धर्मनिरपेक्षतेचा संदेश उपस्थितांना प्रेरणादायी ठरला. आयोजकांनी सांगितले की छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श सर्व धर्म,जाती व समाज घटकांना एकत्र बांधणारा असून युवकांनी शिवरायांच्या विचारांवर चालत समाज व राष्ट्र उन्नतीसाठी कार्य करावे असा संदेश देण्यात आला. संपूर्ण परिसर शिवमय वातावरणाने भारावून गेला होता.


## जाफराबाद पंचायत समितीचा कारभार 'रामभरोसे' कर्मचाऱ्यांच्या दांड्यामुळे घरकुल लाभार्थी वाऱ्यावर!

हप्त्यांसाठी गरिबांची पायपीट,भ्रष्टाचाराचेही गंभीर आरोप

जाफराबाद ।हरी भालके

जाफराबाद पंचायत समितीमध्ये सध्या प्रशासकीय अनागोंदीचा कळस गाठला गेला आहे. गटविकास अधिकाऱ्यांचे (इऊज) कर्मचाऱ्यांवर अजिबात नियंत्रण नसल्याने अनेक विभागांचे कर्मचारी सातत्याने गैरहजर राहत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या कर्मचाऱ्यांच्या दांडगाईमुळे प्रधानमंत्री आवास योजनेचे (घरकुल) आणि सिंचन विहिरीचे हप्ते रखडले असून, गरिबांची स्वप्नातील घरे अर्धवट अवस्थेत पडली आहेत. या गंभीर प्रकाराची तक्रार नेमकी करायची कोणाकडे? असा संतप्त सवाल तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

हप्ते रखडले: लाभार्थ्यांनी जिओ टॅगिंग, फोटो अपलोड आणि सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही, संबंधित कर्मचारी जागेवर नसल्याने शेकडो फाईल्स प्रलंबित आहेत. तांत्रिक कामे वेळेवर होत



नसल्याने हप्ते रखडले आहेत.

विनाकारण 'रिजेक्शन': अनेक पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव कोणतीही लेखी माहिती किंवा ठोस कारण न देता राज्य स्तरावर 'होल्ड'वर ठेवले जात आहेत किंवा जाणीवपूर्वक 'रिजेक्ट' केले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

आर्थिक विळखा: शासनाकडून वेळेवर हप्ते न मिळाल्याने गरिबांनी खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे काढून घराचे काम सुरू केले. आता मिस्त्री आणि सिमेंट दुकानदारांचा तगादा वाढल्याने गरिबांचे जगणे कठीण झाले आहे.

भ्रष्टाचाराची चर्चा: हप्ते सोडण्यासाठी काही स्तरावर 'टक्केवारी' किंवा मानधनाची मागणी केली जात असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे. यामुळे प्रामाणिक लाभार्थी मात्र भरडले जात आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छावा क्रांतिवीर सेनेचा स्तुत्य उपक्रम.....!

### पोलीस सा.नि.कीशोर पवार यांच्या हस्ते मतिमंद विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप.....!

गेवराई । प्रतिनिधी

दिनांक २०/२/२०२६ रोजी छावा क्रांतिवीर सेनेचे जिल्हाप्रमुख राहुल चाळक व मुक्ताराम मोटे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रेणुकामाता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित मतिमंद निवासी विद्यालय गेवराई येथे विविधी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.यामधे प्रामुख्याने विद्यार्थांची मोफत आरोग्य तपासणी डॉ. लेंडगुळे यांनी केली.तसेच छावा क्रांतिवीर सेनेकडून ब्लँकेट वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन ,पत्रकार विनोद पौळ यांनी केले,तर प्रस्तावित राहुल चाळक यांनी केले,यावेळी



सहपोलिस निरीक्षक संतोष जंजाळ यांनी मार्गदर्शन केले,

यावेळी गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी बोलताना सांगितले की अनाधिकृत खर्चाला टाळा देऊन हा घेतलेला कार्यक्रम केला ही संकल्पना खूप आवडली. यावेळी बोलताना अनिल राऊत यांनी बोलताना सांगितले की छावा क्रांतिवीर सेनेचे काम बीड जिल्ह्यात चांगल्या प्रकारे चालू असून राहुल चाळक व छावा क्रांतिवीर सेनेच्या सर्व पदाधिकारी यांनी हा चांगला कार्यक्रम घेतला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, यावेळी गेवराई पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक किशोर पवार हे बोलत होते,तसेच या कार्यक्रमाला गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप,सह पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ,छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत,मराठवाडा सचिव भगवान सोरमारे , ज्ञानेश्वर तांगडे,गेवराई किराणा असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश बर्गे,तलाठी संघटनेचे तालुका अध्यक्ष किरण दांडगे, ताकडगावचे तलाठी गोविंद ढाकणे,ताकडगावचे ग्रामविकास अधिकारी अनिल आटोळे,पत्रकार विनोद पौळ,अविनाश थोरात,महादेव यादव,गणेश गरुड,कैलास मार्गे,ओम काळे,

आप्पा मोटे,नारायण चाळक, दत्ता गिरी,ओम मोटे,गौरव चौधरी,आप्पासाहेब मोटे,विवेक मोटे,आकाश शिंदे,विकास धस

# ७ लाख २५ हजार रुपये अवैधरित्या रेती साठा जप्त



नांदेड ।प्रतिनिधी

गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करून रेती साठवून ठेवणाऱ्या रेती माफियावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन एकुण ७, २५, ०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असुन या केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन वरीष्ठ अधिकारी यांनी अभिनंदन केले आहे. अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणाऱ्या लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने ओमकांत चिंचोळकर, पोलीस निरीक्षक पो.स्टे. नांदेड ग्रामीण यांचे आदेशान्वये दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वरील ग्रामीण पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पो हे कॉ जाधव, पोकों आसीफ, पोकों जमीर

पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना ९ वाजता गोपनीय माहिती मिळाली की, विष्णुपुरी प्रकल्प जवळ असर्जन शिवारातील गोदावरी नदी पात्रात इंजीन व तराफेच्या सह्याने अवैध रेती उपसा करून साठवणुक होत असल्याची माहीती मिळाल्याने वरील अंमलदार असे विष्णुपुरी प्रकल्प जवळ असर्जन शिवारातील नदी पात्रात वेळ अंदाजे ११ वाजता छापा मारला असता नदी पात्रातुन तराफे व इंजीनच्या सह्याने रेती काढणारे दोन अनोळखी आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेले, सदर नदी पात्रात मिळुन आलेले वरील नमुद तराफे व इंजीन जागीच पंचा समक्ष जाळुन तोडुन नाश केले व नदी किनारी साठवून ठेवलेली रेती पंचा समक्ष जप्त करूण खाजगी वाहणाने पो.स्टे.ला घेऊन येऊन जमा केली आहे.दोन अनोळखी आरोपी विरूध्द कलम ३०३( २), ३( ५) भा. न्या.सं, सहकलम ४८ ( ७), ४८( ८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५, सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे नांदेड पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, यांनी कौतुक केले आहे.

# सतीश वाघमारे यांना एम.सी.जे पदवी प्रदान

मुखेड ।प्रतिनिधी

पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण मानला जाणारा बीए एम सी जे ( मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम) या परीक्षेत वाघमारे यांनी प्रथम श्रेणित यश संपादन प्राप्त केल्यामुळे वाघमारे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात आले मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथिल रहिवासी असलेले सतीश शेषेराव वाघमारे यांनी नांदेड येथे असलेल्या श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयात ३ वर्ष पत्रकारिता क्षेत्रातील महत्वपुर्ण मनाला जाणारा (बी.ए,एम.सी.जे ) मास कम्युनीकेशन जर्नालिसम या व्यवसाय भूमीक परीक्षेचा परिपूर्ण अध्ययन करून प्रथम श्रेणित यश संपादन केले आहे. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे सतीश वाघमारे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एमसी जे पदवी प्रदान करण्यात आले. हा भव्यदिव्य पदवी वितरण सोहळा वार - शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २६ रोजी नांदेड श्री गुरुगोविंद सिंग जी पत्रकारिता महाविद्यालय मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष- प्रा. विकास कदम, प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशार सिंग साबळे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. शेखर घुंगरवार, डॉ. देवदत्त देशपांडे, विकास कदम,आदिजन विचार पिठावर उपस्थित होते.




वाघमारे यांना चउग पदवी प्रदान करण्यात आल्यामुळे पत्रकार बाबुराव वाघमारे, दत्तात्रय तिपणे, केशव रापतवार नरसिंग अस्वले, उत्तम वाडीकर, साईनाथ कोडगिरे, सनमुख मठदेवरू, गणेश जाधव,अजित पवार, विश्वनाथ अरण्य, नागनाथ ससाणे यांनी अभिनंदन केले आहे.

# महात्मा फुले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

नांदेड ।प्रतिनिधी

नांदेड येथील महात्मा फुले हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी कराटे व क्रिकेट या क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा व जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.१४ वर्षांखालील शालेय राज्यस्तरीय कराटे स्पर्धात रुद्रराज नितीन पारदे याने राज्यातून प्रथम क्रमांक पटकावत भव्य यश मिळविले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर इंदोर मध्यप्रदेश येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

तसेच १४ वर्षांखालील शालेय राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेतील निवड चाचणीत अफान शेखानी याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. नाशिक येथे झालेल्या निवड प्रक्रियेनंतर राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड निश्चित झाली आहे. दरम्यान, युवराज दत्ता रामरूपे याची गतवर्षी केंडन्स या नामांकित क्रिकेट अकॅडमीत निवड झाली होती. सातत्यपूर्ण सराव व उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची निवड महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महाराष्ट्र क्रिकेट संघात झाली. गुजरात येथे झालेल्या पाच राज्यांच्या स्पर्धेत त्याने दोन सामन्यात मॅन ऑफ द मॅच किताब पटकावत निवड समितीचे लक्ष वेधले. त्यानंतर मुंबई, गुजरात, बडोदा, सौराष्ट्र व महाराष्ट्र संघांसोबत विकेटकीपर व फलंदाज म्हणून वेस्ट झोन इंडिया संघाच्या कॅम्पसाठी त्याची निवड झाली आहे.

महात्मा फुले हायस्कूलच्या या तिन्ही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे शाळेच्या क्रीडा परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला असून नांदेड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

# भाजप सरकारच्या काळात हिंदू सुरक्षित आहेत का? देळुबमध्ये जमावाचा हैदोस; एका समाजाला लक्ष्य केल्याचा आरोप

अर्धापूर ।प्रतिनिधी

राज्यात भारतीय जनता पक्षाचे (महायुती) सरकार असताना आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावर राजकारण तापलेले असतानाच, अर्धापूर तालुक्यातील देळुब बु. येथे एका विशिष्ट समाजाच्या तरुणाला घरात घुसून मारहाण करण्याची खळबळजनक घटना घडली आहे. गोवंश कापल्याचा व्हिडिओ का बनवला, या कारणावरून ५९ जणांच्या बेकायदेशीर जमावाने एका हिंदू तरुणाच्या घरावर हल्ला करत तोडफोड केली. राज्यात भाजपची सत्ता असतानाही एका समाजावर असा अन्याय होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

फिर्यादी स्वप्निल आनंद बोंढारे (२४) याने गोवंश हत्येचा व्हिडिओ बनवल्याचा राग मनात धरून, आरोपींनी त्याला मशिदीसमोर बोलावून घेतले. तिथे त्याला अश्लील शिवीगाळ करत कापून फेकून देण्याची धमकी देण्यात आली. हा वाद केवळ शब्दांपुरता मर्यादित राहिला नाही; तर स्वप्निल मंदिरातून परतत असताना त्याच्यावर दगडफेक करण्यात आली आणि जमावाने चक्क त्याच्या घरात शिरून सामानाची नासधूस केली.

राज्यात भाजप सत्तेत असताना एका हिंदू तरुणाला अशा प्रकारे लक्ष्य केले जाणे, हे कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणारे आहे. एका समाजावर अन्याय होत असल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये पसरली आहे. या प्रकरणी गावाच्या सरपंचासह (अजहरखान पठाण) ५९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भाजपच्या 'राज्यात' धर्मांध शक्तींना इतके बळ कोठून मिळते, असा सवाल आता विचारला जात आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३, ३२४(४), १२५ सह अन्य कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आला असून गावात सध्या तणावपूर्ण शांतता असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दगडफेक आणि घरात घुसून तोडफोड, परिसरात भीतीचे वातावरण गावातील वातावरण शांत ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले असले, तरी एका समाजावर झालेल्या या थेट हल्ल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. तर या घटनेचे सर्व स्तरातून निषेध केला जात आहे. खालील ५९ जणांवर गुन्हा दाखल.... १) चांदपशा पटेल २) एजाज पटेल ३) आवेस पटेल ४) फिरोज चॉदपाशा पटेल ५) सादमियाखान पटेल ६) एहसान पटेल ७) शकील शमसुर शेख (कासार) ८) अब्दुल शेख (कासार) ९) जुनेद उर्फ नियाजअली सरदारखान पठाण १०) खाजा शमसुर शेख (कासार) ११) जमात पटेलमिया खान १२) जाजिब रईसखान पठाण १३) अलीयाब शकीलखान पठाण १४) बिलाल खान पठाण १५) मुसेब गौस पटेल १६) अजहरखान पठाण (सरपंच देळुब बु.) १७) माजीतखान सत्तार खान पठाण १८) दुजान पठाण १९) इमरोज चांदपाशा पटेल २०) जुबेर पाशा शेख २१) अमेर पाशा शेख २२) सुमेर पाशा शेख २३) पाशा बशिर शेख २४) मौलाना फजीलीदखान अजमदखान पठाण २५) लदिम पठाण २६) ईरशाद पठाण २७) फैजान मोईनखान पठाण २८) ईक्राम मोईनखान पठाण २९) नवाज पठाण ३०) सरोवर महबूब कुरेशी ३१) सुलतान महबूब कुरेशी ३२) इस्माईल मौला कुरेशी ३३) शफी मौला कुरेशी ३४) इमाम मेहबूब कुरेशी ३५) जिलानी कुरेशी ३६) मलिक पठाण ३७) अतिफ एजाज शेख (कासार) ३८) आतिक (कासार) ३९) सुलेमान अजगरमिया ४०) शेख अजीम शेख पाशा ४१) तंजिम पाशा पठाण ४२) हाफिज सत्तार शेख ४३) सुलेखान सादेखान पठाण ४४) शेख सुफी शेख मन्नु ४५) शेख खयुम शेख नूरमिया ४६) मुबिन हबीब कुरेशी ४७) जुबेर पाशा शेख ४८) रईस खान शेरखान पठाण ४९) एजाज कासार ५०) ईद्रीसखान पठाण ५१) आवेसखान पठाण ५२) सोयब गौसखान पठाण ५३) रौफ वैदोद्दीन काजी ५४) गौस तादनशहा ५५) शेख ऐजाज शेख महेबुब ५६) पप्पु शकिल जहागीरदार ५७) शेख पाशा शेख वजीर ५८) अयुब करिम कासार ५९) फैज मस्तानखान पठाण सर्व रा. देळुब बु. ता. अर्धापूर

# किनवट पोलिसांची मास रेड मोहीम : मटका व गावठी दारू प्रकरणी ४ गुन्हे दाखल

किनवट ।प्रतिनिधी

किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्या विरोधात राबविण्यात आलेल्या मास रेड मोहिमेत मटका जुगार व गावठी दारू विक्रीवर मोठी कारवाई करण्यात आली. शहर व परिसरातील विविध ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी दोन मटका अड्ड्यांवर तसेच दोन गावठी दारू विक्रेत्यांवर कारवाई केली असून एकूण चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सागर झाडे, पोलीस अंमलदार दिलीप सिरमनवार, संग्राम मुंडे, हेड कॉन्स्टेबल प्रदीप आत्राम, सिद्धार्थ वाघमारे, ओंकार पुरी, तसेच पोलीस शिपाई संजय राजने आदींच्या पथकाने विविध ठिकाणी मास रेड ची कारवाई केली.

पहिल्या कारवाईत फिर्यादी पोलीस शिपाई सदाशिव माणिकराव अनंतवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून विठ्ठल खंडू गीमेकर (वय ५२, रा.घोटी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून ८५० रुपये रोख रक्कम, मटक्याचे आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या, दोन कागदी चिठ्ठ्या व एक बॉलपेन असा जुगाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत फिर्यादी पोलीस शिपाई बाळू भुजंगराव कुडमेते (ब.क्र. २४) यांच्या फिर्यादीवरून देवराव सोनबा बोरकर (वय ५८, रा. कोठारी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून १,०५० रुपये रोख रक्कम, मटक्याच्या चिठ्ठ्या व जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

दोन्ही आरोपी टाईम ओपन नावाच्या मटका जुगारावर लोकांकडून पैसे घेऊन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी जुगार खेळत व खेळवीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल दिलीप सिरमनवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.तिसऱ्या कारवाईत फिर्यादी पोलीस शिपाई संजय दिगंबर राजने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून इलवंत महादू मुरमुरे (वय ५३, रा. बोधडी, ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून दोन प्लास्टिक कॅनमध्ये सुमारे ४० लिटर हातभट्टीची गावठी दारू (अंदाजे किंमत ४,००० रुपये) जप्त करण्यात आली. आरोपी विनापरवाना बेकायदेशीररीत्या दारू साठवून विक्री करत असल्याचे आढळून आले. या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ वाघमारे यांच्याकडे देण्यात आला आहे.चौथ्या कारवाईत ही गावठी दारू विक्री संदर्भात स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधित आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी सांगितले की, किनवट पोलिस दलाने अवैध जुगार व दारू विक्री विरोधात कठोर भूमिका



घेतली असून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा दिला आहे. मास रेड मोहिमेमुळे अवैध व्यवसायिकां मध्ये खळबळ उडाली असून नागरिकांनीही बेकायदेशीर कृत्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संचलित किनवट उपकेंद्रात स्व. उत्तमराव राठोड यांची ९६ वी जयंती उत्साहात

किनवट ।प्रतिनिधी

कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथे माजी खासदार स्व. उत्तमरावजी राठोड यांची ९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत जाधव उपस्थित होते. त्यांनी स्व. राठोड यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे किनवटच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉ. योगेश आंबुलगेकर यांनी -ख (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाद्वारे स्व. राठोड यांचा आवाज पुनरुज्जीवित करण्याचा अनोखा प्रयोग सादर केला. त्यांच्या आवाजातून केंद्राच्या भावी वाटचालीबाबत संदेश सादर करण्यात आला, ज्यामुळे उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले.मुख्य मार्गदर्शक डॉ. समाधान दराडे यांनी स्व. राठोड यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय समारोपात केंद्राचे समन्वयक डॉ. नितीन गायकवाड यांनी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधनाची ओळख निर्माण करीत असल्याचे सांगितले.यावेळी हायकोर्टाचे ज्येष्ठ विधिज्ञ श्रीकांत राठोड, सामाजिक कार्यकर्ते विनायक गव्हाणे, डॉ. सुनील व्यवहारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. योगेश आंबुलगेकर यांनी, सूत्रसंचालन प्रा. श्रेयस पवार यांनी तर आभार प्रदर्शन चेतन जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सह-प्राध्यापक डॉ. प्रमोद राठोड, प्रा. श्रीकांत दुधारे, रमेश जाकुलवार तसेच कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# बरबडा व सोमठाना या दोन केंद्रावर जिल्हाधिकारी कर्डीले यांची अचानक भेट

नायगाव ।प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील सोमठाना येथील दिनानाथ मंगेशकर या शाळेत व बरबडा येथील जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालय बरबडा येथील परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अचानक भेट दिली नव्याने स्थापन झालेल्या सोमठाना येथील केंद्रावर परीक्षा सुरू होण्यापूर्वी धडक देत त्यांनी केंद्राजवळ भेटीसाठी आलेल्या संस्था चालक व मुख्याध्यापकांना समज देत बाहेर काढले आहे परीक्षा प्रक्रीयेत कोणतीही ढिलाई चालणार नाही असे स्पष्ट संदेश देण्यात आला आहे व बरबडा येथे जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालय येथे पेपर संपल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शाळा सोडले गणित विषयाच्या पेपरसाठी २८१७ विद्यार्थी उपस्थितीत; ४१ विद्यार्थी अनुपस्थित

नायगाव परिक्षक कार्यालय सीयू-२१८ अंतर्गत १२ वी विज्ञान शाखेचा गणित विषयाचा पेपर दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी शांततेत पार पडला. या केंद्रावर एकूण २८५८ विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी २८१७ विद्यार्थी उपस्थित राहिले, तर ४१ विद्यार्थी अनुपस्थित होते. एकूण उपस्थितीचा टक्का सुमारे ९८.५६ इतका नोंदविण्यात आला. केंद्र क्रमांक १४९ श्री साईबाबा विद्यालय, शंकर नगर येथे २३१ पैकी २२८ विद्यार्थी उपस्थित होते, तर ३ जण गैरहजर होते. केंद्र क्रमांक २६० मा. दिनानाथ मंगेशकर विद्यालय, सोमठाणा येथे सर्व १०० विद्यार्थी उपस्थित राहिले. जनता विद्यालय, नायगाव (केंद्र २६१) येथे ३५१ पैकी ३४६ विद्यार्थी उपस्थित होते, तर ५ जण अनुपस्थित होते.

यमुनाबाई कन्या विद्यालय, नायगाव (केंद्र २६२) येथे २६१ पैकी २६०, श्री दत्त विद्यालय, नायगाव (केंद्र २६३) येथे २७२ पैकी २६७, तसेच श्री संत ज्ञानेश्वर रा.मा.वि. धुपा (केंद्र २६४) येथे १४२ पैकी १४१ विद्यार्थी उपस्थित होते.

ओयोसिस इंग्लिश मीडियम स्कूल, कुंटूर (केंद्र २६५) येथे १४१ पैकी १४०, जवाहरलाल नेहरू विद्यालय, बरबडा (केंद्र २६६) येथे ४०० पैकी ३९४, पो.बे.आ. कन्या विद्यालय, मरवाळी तांडा (केंद्र २६७) येथे ३६२ पैकी ३५६ विद्यार्थी उपस्थित राहिले.के. देविदास पवार विद्यालय, कुंटूर तांडा (केंद्र २६८) येथे १५५ पैकी १५०, राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालय, नरसी (केंद्र २६९) येथे ३०४



पैकी २९९, तर जि.प. हायस्कूल, कुंटूर (केंद्र २७०) येथे १३९ पैकी १३६ विद्यार्थी उपस्थित होते.सर्व केंद्रांवर पेपर शांततेत व सुरळीत . परीक्षा प्रक्रियेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडली नसून प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती.




# जालना पोलिसांचा मोठा कारनामा: गावठी पिस्तूलसह ७.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील गुन्हेगारीवर पोलिसांनी कडक कारवाई करत मोठा धक्का दिला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्या टोळीवर धडक कारवाई करत गावठी पिस्तूल व मुद्देमाल जप्त केला असून एकूण ७ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि.२१ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बदनापूर परिसरात अवैध शस्त्र व्यवहार सुरू असल्याची माहिती मिळाली होती.त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत कारवाई केली.छाप्यात गावठी पिस्तूल जिवंत काडतुसे तसेच संबंधित साहित्य जप्त करण्यात आले.

पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला असून शस्त्रांचा स्रोत पुरवठा साखळी आणि टोळीतील इतर सदस्यांचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक कार्यरत आहे.ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून गुन्हेगारांवर कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.